## संपादकीय

### मातृत्वाची काळी बाजू :‘ओव्हेरियन फार्मिंग’चा अमानवी व्यापार

मातृत्व ही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात पवित्र आणि भावनिक अनुभूती मानली जाते. परंतु बदलापूर येथे उघडकीस आलेल्या स्त्री बीज तस्करीच्या प्रकरणाने या पवित्र भावनेलाच काळिमा फासला आहे. विज्ञानाने दिलेल्या आधुनिक वैद्यकीय सुविधांचा वापर करून अनेक वंध्यत्वग्रस्त जोडप्यांना अपत्यप्राप्तीचा आनंद मिळत आहे. आयव्हीएफ (इन-विट्रो फर्टिलायझेशन) तंत्रज्ञानामुळे हजारो कुटुंबांमध्ये आनंदाचे क्षण आले आहेत. मात्र, याच वैद्यकीय तंत्रज्ञानाचा काही लोभी आणि बेकायदेशीर प्रवृत्तीच्या लोकांनी धंदा बनवला आहे, हे बदलापूर प्रकरणातून समोर आले आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र वर्ष-५ अंक-३१३ बुधवार दि.११ मार्च २०२६ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने-६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### जिष्णू देव वर्मा महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल

मुंबई : महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. लोकभवनातील दरबार सभागृह येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपालपदाची शपथ दिली. शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. जिष्णू देव वर्मा हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत. सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी जिष्णू देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधी नंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

### शेतकऱ्यांचे ४३१५ कोटी थकले-वळसे पाटील

मुंबई : प्रतिकूल हवामान तसेच इतर गोष्टींमुळे उसाच्या उत्पादनात १५ टक्क्यांपर्यंत घट झाली आहे. साखर कारखान्यांचा गळीत हंगाम १०० दिवसांच्या आतच संपला आहे. साखर उद्योगा यामुळे अडचणीत सापडला असून ३३०० कोटी रुपयांचा आर्थिक फटका यामुळे बसला आहे. राज्यातील शेतक-यांची ४३१५ कोटी रुपयांची एफआरपी अद्याप थकीत आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होताना दिलीप वळसे पाटील यांनी सरकारला घरचा आहेर केला. वळसे पाटील यांनी केवळ साखर उद्योगावरच नव्हे, तर सरकारच्या कर्जमाफी योजनेतील विसंगतीवरही बोट ठेवले. २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीत मुद्दल आणि व्याजाच्या रकमेची स्पष्टता नसल्याने सोसायट्या संकटात येतील, असे त्यांनी सांगितले. आदिवासी विभागाच्या ‘अमृत आहार’ योजनेचा निधी २०५ कोटींवरून थेट ६२ कोटींवर आणल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.राज्यावर असलेले ११ लाख कोटींचे कर्ज आणि त्यावरील ७० हजार कोटींचे व्याज ही राज्याच्या आर्थिक आरोग्यासाठी चिंतेची बाब आहे.

### महाराष्ट्रातील एकही शाळा बंद होणार नाही -भोयर

मुंबईः राज्यात सुमारे ६५ हजार सरकारी शाळा असून जवळपास १४ हजार शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या २० पेक्षा कमी आहे. काही ठिकाणी समूह शाळांची मागणी होत असली तरी विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून शाळा बंद करण्याचा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही, असे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य जयंत आसगावकर यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर बोलत होते. यावेळी सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे, किरण सरनाईक, जगन्नाथ अभ्यंकर, सुधाकर अडबाले, विक्रम काळे यांनी चर्चेत सहभाग घेतला. राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार संच मान्यता देण्यात आली असून त्यानुसार काही शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेतही मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिनियम २००९ च्या तरतुदींशी ही प्रक्रिया सुसंगत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरीही शिक्षक अतिरिक्त ठरल्यास त्यांचे योग्य त्या ठिकाणी समायोजन करण्यात येईल आणि कोणतीही शाळा शिक्षकांविना राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१० मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १११.०० क्विंटल | | |
| १,९६१ | २,४८१ | २,१७२ |
| ज्वारी/हायब्रिड: १४६.५० क्विंटल | | |
| २,१७० | ४,३४० | ३,१२६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १७.५० क्विंटल | | |
| ७,३९१ | ७,६८० | ७,५५९ |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | | |
| २,५३० | २,८०० | २,६९३ |
| मुग: २.०० क्विंटल | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १९०.५० क्विंटल | | |
| ५,३४० | ५,५२५ | ५,४३८ |
| हरभरा: २८.५० क्विंटल | | |
| ४,८९१ | ५,०१० | ४,९४४ |

# उद्योगपतींचे १६ लाख कोटी माफ; पण शेतकऱ्यांसाठी फक्त २ लाख?

## सातबारा कोरा’चे आश्वासन कुठे गेले? विधानसभेत जयंत पाटील यांचा सरकारवर जोरदार हल्ला

मुंबई । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन निवडणुकीपूर्वी देण्यात आले होते. शेतकऱ्याला कर्जमुक्त करायचे असे सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात सरकारने केवळ २ लाखांपर्यंतच कर्जमाफी जाहीर केली. महागाई वाढली, खताचे दर वाढले, सर्वांनाच महागाई आहे; मग महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना महागाई नाही का? असा थेट सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी विधानसभेत उपस्थित केला.**



मंगळवारी (१० मार्च) राज्याच्या अर्थसंकल्पावर सुरू असलेल्या सर्वसाधारण चर्चेत बोलताना पाटील यांनी सरकारच्या कर्जमाफी निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. त्याचा अर्थ शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त करणे असा होतो; मात्र सरकारची घोषणा त्या आश्वासनाशी विसंगत असल्याचे त्यांनी म्हटले. २०१९ साली उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारनेही २ लाखांची कर्जमाफी दिली होती. सात वर्षांनंतरही कर्जमाफीची मर्यादा तिथेच असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. दरम्यान राज्यावरील कर्जाचा बोजा ४ लाख कोटींवरून ११ लाख कोटींवर गेला, मात्र शेतकऱ्यांना दिलासा देण्यात वाढ झाली नाही, असेही त्यांनी नमूद केले. ‘‘शेतकऱ्याचे दोन लाख कर्ज माफ झाले, पण त्याच्यावर आठ लाखांचे कर्ज आहे. उरलेले सहा लाखांचे काय?’’ असा सवाल करत पाटील म्हणाले की, कर्जमाफीची मर्यादा ५ लाखांपर्यंत केली असती तर विशेषतः विदर्भातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असता. सरकारने सहकारी बँकांकडून ९ मार्च २०२६ पर्यंत नियमित ▶▶ पान २ वर

# साइड इफेक्ट्सची आकडेवारी जारी करा

## कोविड-१९ लसीकरणानंतरच्या दुष्परिणामांची चौकशी करण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली । वृतसंस्था

**सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी कोविड-१९ लसीकरणानंतरच्या दुष्परिणामांच्या चौकशीसाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला निर्देश दिले की, ज्यांना कोविड-१९ लसीकरणानंतर गंभीर प्रतिकूल घटनांचा सामना करावा लागला आहे, अशा लोकांसाठी नो-फॉल्ट नुकसानभरपाई धोरण तयार करावे. न्यायालयाने दुष्परिणामांशी संबंधित आकडेवारी वेळोवेळी सार्वजनिक करण्यासही सांगितले आहे.**




न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने मंगळवारी त्या याचिकेवर सुनावणी केली, ज्यात लसीकरणानंतर झालेल्या कथित दुष्परिणामांमुळे मृतांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली आहे. २०२१ मध्ये कोविशील्डची पहिली मात्रा घेतल्यानंतर २ महिलांचा मृत्यू झाला होता, ▶▶ पान २ वर

# महिला कर्मचाऱ्यांना १ वर्षांपर्यंत प्रसुती रजा

## सुनेत्रा पवार यांच्या शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महिलांसाठी मोठ्या घोषणा केल्या आहेत. राज्यातील सरकारी कर्मचारी महिलांसाठी सुनेत्रा पवार यांनी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. लवकर या, या लवकर जा, अशी योजना सुनेत्रा पवार यांनी जाहीर केली आहे. मुंबई महानगर प्रदेशात शासकीय कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या महिलांसाठी या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. तसेच वैद्यकीय कारणास्तव महिलांना प्रसुती रजा आता १ वर्षापर्यंत घेता येणार, अशीदेखील महत्त्वाची घोषणा सुनेत्रा पवार यांनी केली आहे.



‘महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनाने महिला शासकीय कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. केंद्र शासनाच्या धर्तीवर १८० दिवसांची प्रसुती रजा मंजूर करण्यात आली आहे. प्रसुती रजेनंतर गरज भासल्यास कमाल १ वर्षापर्यंत वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय देय अर्धवेतन रजा घेण्यासही परवानगी देण्यात आली ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींना धक्का १ कोटी ५ लाख अपात्र?

## यंदा योजनेच्या बजेटमध्ये सुमारे १९ हजार कोटी रुपयांची कपात

मुंबई । प्रतिनिधी

‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेत पात्रतेच्या तपासणीनंतर मोठ्या संख्येने महिला या योजनेतून बाहेर पडण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे एक कोटी ५ लाख महिला विहित निकषांवर पात्र ठरत नाहीत. हेच लक्षात घेऊन यावर्षीच्या अर्थसंकल्पात केवळ १.४८ कोटी लाभार्थ्यांसाठी २६५०० कोटी रुपयांची



तरतूद करण्यात आली आहे. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा योजनेच्या बजेटमध्ये सुमारे १९ हजार कोटी रुपयांची कपात करण्यात ▶▶ पान २ वर

# काँग्रेस-वंचितचा २३ रोजी आरएसएस मुख्यालयावर मोर्चा

## मोर्चासाठी मुंबईत बैठक, ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा पंतप्रधान मोदींवर गंभीर आरोप

मुंबई । प्रतिनिधी

देशाच्या सार्वभौमत्व आणि आर्थिक स्वायत्ततेशी तडजोड केल्याचा आरोप करत काँग्रेस पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीने नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) मुख्यालयासमोर मोठे आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर १० मार्च रोजी मुंबईतील फोर्ट परिसरातील ठाकरसी हाऊस येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत २३ मार्च रोजी नागपूर येथे आरएसएस




मुख्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी दिला.

या बैठकीनंतर बोलताना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर तीव्र टीका केली. देशाच्या आर्थिक धोरणांपासून ते राजकीय निर्णयांपर्यंत अनेक बाबतीत सरकारने शरणागती पत्करल्याचा आरोपही यावेळी केला. ॲड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, भारत सरकार एकंदरीत ‘सेल आऊट’ झालेले आहे. हा केवळ आर्थिक सेल आऊट ▶▶ पान २ वर

# समान नागरी संहिता लागू करण्याची गरज

## मुस्लिम महिलांच्या वारसा हक्कांवर सर्वोच्च न्यायालयाची भुमिका

नवी दिल्ली । वृतसंस्था

मुस्लिम महिलांवरील भेदभावाच्या आरोपावरून शरियत कायदा, १९३७ मधील काही तरतुदी रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.१० ) समान नागरी संहिता (यूसीसी) लागू करण्याची गरज अधोरेखित केली. मात्र, या विषयावर



अंतिम निर्णय घेणे हे विधिमंडळाचे काम असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी न्यायालयाला विनंती केली की, मुस्लिम महिलांना पुरुषांप्रमाणे समान वारसाहक्क देण्याचा अधिकार घोषित करावा. तसेच शरियत कायदा रद्द झाल्यास भारतीय वारसा कायदा लागू करण्याचा ▶▶ पान २ वर

# सोशल मीडियावरील बदनामीला आळा घालण्यासाठी पोलिस डीजीच्या अध्यक्षतेखाली समिती-मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

**सोशल मीडियाच्या माध्यमातून महिलांची होणारी बदनामी आणि सायबर छळवणुकीच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्न उत्तराच्या तासात सांगितले.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६ (अ) सारख्या तरतुदीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने बदल केले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखून, सध्याच्या परिस्थितीत गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी ▶▶ पान २ वर

# अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन १८,१९ एप्रिल रोजी उदगीर येथे होणार

## मुख्यमंत्री येणार बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले स्वागताध्यक्ष

मुंबई । प्रतिनिधी

**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन १८ आणि १९ एप्रिल रोजी लातूर जिल्ह्यात उदगीर येथे होत असल्याची घोषणा परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख आणि अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी मंगळवारी येथे केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होत असून, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे राजे भोसले अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष असतील.**

पत्रकारांची मातृसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि ८७ वर्षांची दैदिप्यमान परंपरा लाभलेल्या अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे दर दोन वर्षांनी राज्याच्या वेगवेगळ्या भागात राष्ट्रीय अधिवेशन होते. यापुर्वी रोहा, पिंपरी-चिंचवड, शेगाव, नांदेड येथे परिषदेची अधिवेशने झाली. यावेळेस उदगीर येथे अधिवेशन होत असून अधिवेशनाची जोरदार तयारी सुरू आहे. परिषदेच्या एका शिष्टमंडळाने स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, स्थानिक आमदार संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांना अधिवेशनास प्रमुख पाहुणे म्हणून





उपस्थित राहण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांनी परिषदेची विनंती मान्य केली असून ‘‘मी नक्की येतो‘‘ असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. मुख्यमंत्र्यांना भेटलेल्या शिष्टमंडळात परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, सातारा जिल्हा अध्यक्ष हरिष पाटणे, परिषदेचे लातूर विभागीय सचिव सचिन शिवशेट्टे, मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, मुंबई अध्यक्ष राजा आदाटे, संयोजन समितीचे युवराज धोत्रे आदि उपस्थित होते. यंदाचे अधिवेशन हटके होणार आहे. देशभरातील मान्यवर पत्रकारांना सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात येणार असून, यासाठी अधिवेशनास देशभरातून ३००० पत्रकार येतील असा अंदाज असून त्यादृष्टीने व्यवस्था करण्यात आली आहे. अधिवेशनाच्या कार्यालयाचे उद्घाटन देखील नुकतेच एस.एम.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी पत्रकारांच्या दृष्टीने गौरवाचा सोहळा असलेल्या परिषदेच्या अधिवेशनास मोठ्या संख्येनं उपस्थित राहण्याचे आवाहन एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# मातृत्वाची काळी बाजू : 'ओव्हेरियन फार्मिंग'चा अमानवी व्यापार

मातृत्व ही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात पवित्र आणि भावनिक अनुभूती मानली जाते. परंतु बदलापूर येथे उघडकीस आलेल्या स्त्री बीज तस्करीच्या प्रकरणाने या पवित्र भावनेलाच काळिमा फासला आहे. विज्ञानाने दिलेल्या आधुनिक वैद्यकीय सुविधांचा वापर करून अनेक वंध्यत्वग्रस्त जोडप्यांना अपत्यप्राप्तीचा आनंद मिळत आहे. आयव्हीएफ (इन-विट्रो फर्टिलायझेशन) तंत्रज्ञानामुळे हजारो कुटुंबांमध्ये आनंदाचे क्षण आले आहेत. मात्र, याच वैद्यकीय तंत्रज्ञानाचा काही लोभी आणि बेकायदेशीर प्रवृत्तीच्या लोकांनी धंदा बनवला आहे, हे बदलापूर प्रकरणातून समोर आले आहे.

गरीबी, आर्थिक विवंचना आणि अज्ञानाचा फायदा घेत गरीब महिलांना या अवैध रॅकेटमध्ये ओढले जात होते. स्त्री बीज देण्यासाठी महिलांना १८ ते २५ हजार रुपये देण्याचे आमिष दाखवले जात होते. तर एजंट म्हणून काम करणाऱ्या महिलांना तीन हजार रुपयांचे कमिशन मिळत होते. एका महिलेकडून केवळ एकदाच स्त्री बीज काढण्याची कायदेशीर परवानगी असतानाही बदलापूर प्रकरणात एका महिलेकडून दहा ते बारा वेळा बीज काढण्यात आल्याचे उघड झाले आहे. हे केवळ कायद्याचे उल्लंघन नाही तर त्या महिलांच्या आरोग्याशी आणि जीवाशी खेळणारे अत्यंत धोकादायक कृत्य आहे.

या रॅकेटची धक्कादायक बाब म्हणजे यात महिलाच प्रमुख एजंट म्हणून काम करत होत्या. गरजू आणि गरीब महिलांना शोधून त्यांना पैशाचे आमिष दाखवणे, बनावट कागदपत्रे तयार करणे, बेकायदेशीर सोनोग्राफी करून घेणे आणि त्यांना विविध राज्यांमध्ये पाठवणे असा संपूर्ण साखळीबद्ध प्रकार उघड झाला आहे. तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात आणि केरळ अशा राज्यांमध्ये या महिलांना पाठवले जात असल्याची माहिती समोर आली आहे. इतकेच नव्हे तर या स्त्री बीजांची विदेशातही विक्री होत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे हा केवळ राज्यापुरता मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेला मोठा रॅकेट असू शकतो.

या प्रकरणाचा उगम बदलापूरमध्ये झाला असला तरी त्याची मुख्य सूत्रे नाशिकमध्ये असल्याचे संकेत मिळत आहेत. एका डॉक्टरने आपल्या पत्नीच्या नावावर आयव्हीएफ सेंटर चालवून हा अवैध व्यवसाय सुरू ठेवला होता. यात सोनोग्राफी सेंटर्स, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह आणि काही एजंट यांचेही जाळे असल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून लाखो रुपयांची इंजेक्शन्स आणि औषधसाठा जप्त केला आहे. हे सर्व पाहता या अवैध व्यापाराची व्याप्ती किती मोठी आहे याची कल्पना येते.

वैद्यकीय विज्ञानाने मानवजातीला अनेक वरदानं दिली आहेत. परंतु जेव्हा विज्ञानाचा वापर माणुसकी विसरून केवळ पैशासाठी केला जातो, तेव्हा त्याचे परिणाम अत्यंत भयावह ठरतात. आयव्हीएफ केंद्रे मूल न होणाऱ्या जोडप्यांसाठी आशेचे केंद्र असायला हवीत; परंतु काही ठिकाणी ती ''मुलांची फॅक्टरी'' बनत असल्याचे चित्र चिंताजनक आहे. वैद्यकीय क्षेत्रातील काहींच्या अनैतिक वागणुकीमुळे संपूर्ण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

यापूर्वीही महाराष्ट्रात बेकायदेशीर गर्भलिंग निदान आणि गर्भपाताच्या प्रकरणांनी समाज हादरला होता. बीड जिल्ह्यातील डॉक्टर दाम्पत्याच्या कृत्यांनी मानवतेलाच काळिमा फासला होता. आता बदलापूरमधील 'ओव्हेरियन फार्मिंग' प्रकरणाने पुन्हा एकदा वैद्यकीय व्यवस्थेतील काळी बाजू समोर आणली आहे.

या पार्श्वभूमीवर सरकार आणि तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे आहे. केवळ काही एजंट किंवा मध्यस्थांना अटक करून हा विषय संपणार नाही. या संपूर्ण रॅकेटची मुळापर्यंत चौकशी करून त्यामागील डॉक्टर, आयव्हीएफ केंद्रे, आर्थिक व्यवहार आणि आंतरराज्य तसेच आंतरराष्ट्रीय संबंध उघड करणे अत्यावश्यक आहे. तसेच आयव्हीएफ केंद्रांवर कडक नियंत्रण ठेवणे, नियमित तपासणी करणे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर समाजालाही याबाबत जागरूक होण्याची गरज आहे. आर्थिक अडचणीमुळे महिलांनी अशा प्रलोभनांना बळी पडू नये, यासाठी शासनाने जनजागृती करणे आवश्यक आहे. गरीब आणि गरजू महिलांचे संरक्षण करणे ही देखील समाजाची जबाबदारी आहे. बदलापूर प्रकरणाने एक गंभीर प्रश्न उभा केला आहे. मातृत्वासारख्या पवित्र भावनेलाही बाजारपेठेचा चेहरा का द्यावा लागतो आहे? जर यावर वेळेत कठोर कारवाई झाली नाही, तर उद्या मातृत्वदेखील पैशाच्या व्यवहारात मोजले जाणारे एक 'उत्पादन' बनण्याची भीती नाकारता येणार नाही. त्यामुळे या 'ओव्हेरियन फार्मिंग'च्या जाळ्याचा पूर्णपणे नायनाट करणे हीच आजची सर्वात मोठी गरज आहे.

# तणावात जगण्यापेक्षा हसत जगा-डॉ.जगदीश टेकाळे



**हल्ली बहुतेक सगळ्यांनाच ताणतणाव असतात. असा माणूस शोधूनही सापडणार नाही ज्याला काहीच तणाव नाही. तणाव मानसिक आणि शारीरिक स्वरूपाचा असतो. कधीकधी क्षुल्लक वाटणारा एखादा प्रसंगही व्यक्तीमध्ये तणाव निर्माण करतो. तणावामुळे माणसाच्या मनावर आणि शरीरावर वाईट परिणाम होऊ शकतो. तणावग्रस्त व्यक्तीच्या जीवनात निरुत्साह, उदासीनता येते त्यामुळे अशी व्यक्ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही.**

परीक्षेच्या काळात जवळ जवळ बहुतांश विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण येतो, याची वेगवेगळी कारणे असू शकतात. अगदी परीक्षेची तयारी पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही कमी-जास्त प्रमाणात ताण येतोच. परीक्षेच्या वेळी तणाव येऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाचे नीट नियोजन करणे गरजेचे आहे. परीक्षा फक्त शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुरतीच मर्यादित नसते. इंटरव्ह्यू असो, स्पर्धा परीक्षा असो, प्रेझेंटेशन असो, अशावेळी सुद्धा थोड्याफार प्रमाणात ताण येतोच. त्यांना आपण आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडू शकू की नाही याची धास्ती वाटते. इतरांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, तर काय होईल याचा ताण त्यांना येतो. काही विद्यार्थी आपली तुलना दुसऱ्यांशी करतात. तो अमुक किती हुशार आहे. आपण त्याच्यापुढे काहीच नाही, असा विचार करून बऱ्याच विद्यार्थ्यांना तणाव येतो. आपल्याला परीक्षेत आठवेल की नाही, जो अभ्यास केला तोच येईल की नाही असा विचार करून काही विद्यार्थी आपली तब्येत बिघडवून घेतात. अशावेळी थोडं मनाला शांत करून एक दीर्घ श्वास घ्यावा त्यामुळे आलेला ताण थोडा हलका होण्यास नक्कीच मदत होते. परीक्षेत आपणही इतरांपेक्षा चांगलं करून दाखवू शकतो याची खात्री बाळगावी. जो अभ्यास केला तो जरी नीट लक्षात ठेवला तरी आपल्यातील आत्मविश्वास वाढतो. अर्थात त्यासाठी नियमित अभ्यास गरजेचा आहे. आजचे युग स्पर्धेचे आहे. इथे कुणीही ताणतणावापासून मुक्त नाही. जीवनातील ध्येय प्राप्त करायचे असेल, तर जीवनात थोडा ताण असणेही गरजेचे आहे. त्याशिवाय आपण मेहनत कशी करणार ? प्रत्येकाची तणावाची कारणे वेगवेगळी असतात. नकारात्मक विचारांना बाजूला सारून आपले ध्येय गाठण्यासाठी सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मनाला रोज सांगायचे की मी हे काम करू शकतो किंवा शकते. म्हणजे तणाव येणं कमी होईल. भविष्याचा विचार करणाऱ्या लोकांना जास्त ताण येतो. जे होणार आहे ते आपल्या हातात नाही. म्हणूनच जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे आणि जीवनाचा मनमुराद आनंद घ्यावा. हसण्यानेही कितीतरी ताण कमी होतो. ताण कमी करण्यासाठी आपण आपल्या आवडत्या सिरीयल्स पाहू शकतो, आवडत्या लेखकाची पुस्तके वाचणे, छंद जोपासणे, नाटक, सिनेमा पाहू शकतो. यामुळे नक्कीच ताण कमी होईल. तणाव एक नैसर्गिक भावना आहे. मनात भीती निर्माण झाली की तणाव येतो. यातून बाहेर पडण्यासाठी आपण योग्य मार्गदर्शन मिळवू शकतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# महानगरपालिकेतील स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था; जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**जालना येथील नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिकेमधील स्वच्छतेच्या व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. महानगरपालिकेतील स्वच्छतागृहामध्ये घाणीचे साम्राज्य पसरलेले असून स्वच्छतेची अत्यंत दयनीय अवस्था दिसून येत आहे. स्वच्छतागृहातील भांडी भरलेली असून साफसफाईकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे चित्र समोर आले आहे.**





सध्या जालना महानगरपालिकेला कायमस्वरूपी आयुक्त नसल्यामुळे प्रशासनातील कामकाजावर परिणाम होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. महानगरपालिकेचा अतिरिक्त पदभार जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्याकडे असल्याचे सांगितले जाते. गेल्या चार ते पाच महिन्यांपासून हा पदभार त्यांच्या कडे असूनही स्वच्छता व्यवस्थेत सुधारणा दिसून येत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. महानगरपालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शहरात तसेच कार्यालय परिसरात घाणीचे साम्राज्य पसरल्याचा आरोपही करण्यात येत आहे. प्रशासनावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेला कायमस्वरूपी आयुक्त नेमणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त आशिमा मित्तल यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास महानगरपालिकेतील कामकाजात सुधारणा होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# वाघोडा तांड्यातील सुमित पवार झाले पोलिस उपनिरीक्षक; गावकऱ्यांकडून सत्कार

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील वाघोडा तांडा येथील युवक सुमित सुभाष पवार यांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करून पोलीस उपनिरीक्षक () पद मिळवले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावकऱ्यांनी डीजेच्या तालावर वाजत-गाजत मिरवणूक काढून त्यांचा भव्य सत्कार केला.**



वाघोडा तांड्यावर शेतकरी कुटुंबात वाढलेले सुमित पवार हे गेल्या दोन ते तीन वर्षांपासून स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी अखेर पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्रता मिळवली. त्यांच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक तरुणांना स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी होता येते, अशी प्रेरणा मिळाली आहे. सुमित पवार यांच्या सन्मानार्थ ढोकसाळ ते वाघोडा तांडा अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत गावकऱ्यांनी डीजेच्या तालावर आनंद साजरा केला. सुमित पवार यांच्यासह त्यांच्या आई-वडिलांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्रचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे यांनी उपस्थित राहून सुमित पवार व त्यांच्या पालकांचा सत्कार केला. यावेळी सरपंच सचिन राठोड, उपसरपंच अतुल राठोड, नामदेव पवार, एस. पी. पवार, सदस्य जनार्धन पवार, अनिल राठोड, ज्ञानेश्वर राठोड, अमोल पवार, अविनाश पवार, विजय राठोड, मधुकर पवार, बिरजू पवार, विनोद पवार, विश्वनाथ पवार, इंद्रजित पवार, बिट्टू पवार, पंढरीनाथ पवार, अनिल पवार यांच्यासह वाघोडा तांडा व ढोकसाळ येथील नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महसूल भवनात तीन दिवसीय प्रशिक्षण घेणे बंधनकारक-शशिकांत हदगल

**जालना । प्रतिनिधी**

भारताची आगामी'जनगणना २०२७ यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. या जनगणनेचा पहिला टप्पा म्हणजेच घरसूचीकरण व गृहनिर्माण जनगणना लवकरच सुरू होणार असून, या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय विशेष जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी जनगणनेच्या दृष्टीने हे प्रशिक्षण अत्यंत कळीचे असल्यामुळे, कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला प्रशिक्षणास अनुपस्थित राहता येणार नाही. संपूर्ण प्रशिक्षण घेणे सर्वांसाठी बंधनकारक असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी शशिकांत हदगल यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

हे प्रशिक्षण दि. १६ ते १८ मार्च २०२६ या कालावधीत महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे पार पडणार आहे. प्रशिक्षणाची वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० अशी पूर्णवेळ निश्चित करण्यात आली आहे. जनगणना संचालनालय, मुंबई येथील वरिष्ठ अधिकारी या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सहायक संचालक अजय ठाकूर, विशाल दिवेकर ( .) हे अधिकारी उपस्थित कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील तांत्रिक बाबी, नियमावली आणि विहित वेळेत काम पूर्ण करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. या प्रशिक्षणासाठी संबंधित विभागाचे प्रमुख आणि त्यांच्या अधीनस्थ जनगणना कामकाज पाहणारे सहायक महसूल अधिकारी, महसूल सहायक किंवा प्रतिनियुक्त कर्मचारी यापैकी प्रत्येक कार्यालयातून दोन कर्मचाऱ्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे.

# अनधिकृत होर्डिंगबाजांना २४ तासांत हटवण्याचे आदेश; अन्यथा फौजदारी गुन्हा दाखल होणार

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरातील विद्रुपीकरण थांबवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील वीज खांब, रस्ते तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना लावण्यात आलेले सर्व होर्डिंग, बॅनर आणि पोस्टर्स तात्काळ हटवण्याचे आदेश महानगरपालिकेकडून देण्यात आले आहेत.**

२४ तासांची अंतिम मुदत महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या जाहीर प्रगटनानुसार, शहरातील सर्व नागरिक, संस्था, जाहिरातदार तसेच राजकीय पक्षांना सूचना देण्यात आली आहे की त्यांनी स्वतःहून २४ तासांच्या आत आपले अनधिकृत होर्डिंग, बॅनर व पोस्टर्स काढून घ्यावेत. निर्धारित मुदत संपल्यानंतरही साहित्य न हटवल्यास ते महानगरपालिकेकडून जप्त केले जाईल आणि संबंधित व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा या मोहिमेअंतर्गत पुढील कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ कलम ३ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २४४ व २४५ याशिवाय, अनधिकृत होर्डिंग किंवा बॅनरमुळे कोणतीही जीवितहानी किंवा अपघात झाल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थेवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा देखील दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. शहराच्या सौंदर्यासाठी निर्णय शहराचे सौंदर्य अबाधित राखणे, सार्वजनिक ठिकाणांचे विद्रुपीकरण थांबवणे तसेच संभाव्य अपघात टाळणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे महानगरपालिका प्रशासनाने सांगितले आहे.

## पान १ वरून...

### उद्योगपतींचे १६ लाख कोटी माफ;

कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती मागवली आहे. मात्र शेतकऱ्यांची कर्जफेडीची अंतिम मुदत ३१ मार्च असते. मग ९ मार्चपर्यंतचीच यादी का मागवली जाते? ती १ एप्रिलला मागवली पाहिजे होती, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. केंद्र सरकारवर टीका करताना पाटील म्हणाले की, २०१४ पासून उद्योगपतींचे तब्बल १६ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. देशावरील कर्जाचा बोजा २०२७ पर्यंत २०१४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. उद्योगपतींसाठी पैसा उपलब्ध होतो, मात्र शेतकऱ्यांना मदत करायची म्हटले की पैशांची कमतरता दाखवली जाते. ''पैशांची कमतरता नाही, विचारांची कमतरता आहे,'' अशा शब्दांत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

-----------

### महिला कर्मचाऱ्यांना

आहे. मातृत्वाचा सन्मान राखत, महिलांना कुटुंब आणि सेवेत समतोल राखता यावा हा या निर्णयामागचा उद्देश आहे'', अशी माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली. ''महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महानगर क्षेत्रातील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेला आहे. कम अर्ली, गो अर्ली या संकल्पने अंतर्गत मुंबई महानगर क्षेत्रातील महिला कर्मचाऱ्यांना सकाळी ९.१५ ते ९.४० या दरम्यान लवकर येऊन जितके मिनिटे आधी येऊन कामकाज करता येतील, तितकीच मिनिटे संध्याकाळी कार्यालयातून लवकर निघण्याची म्हणजेच ३० मिनिटे सवलत देण्यात येईल. या निर्णयामुळे गर्दीमुळे महिलांचा होणारी गैरसोय नक्कीच कमी होण्यात मदत होईल'', अशी भूमिका सुनेत्रा पवार यांनी मांडली. ''शक्ती फौजदारी कायदा २०२० हे विधेयक राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठवले होते. मात्र केंद्र सरकारने १ जुलै २०२४ पासून भारतीय न्याय संहिता लागू झाल्यामुळे पूर्वीचे हे विधेयक परत घेण्यात आले आहे. पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारसीनुसार भारतीय न्याय संहितेच्या अनुषंगाने आवश्यक राज्य सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव व विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. त्यावर शासन स्तरावर कारवाई सुरु आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी हा कायदा लवकरच संमत व्हावा यासाठी राज्य शासन आग्रही आहे. याबाबत मी स्वत: मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करुन विशेष प्रयत्न करेन'', अशी ग्वावी सुनेत्रा पवार यांनी दिली.

-----------

### साइड इफेक्ट्सची आकडेवारी

असा आरोप आहे. सध्याची व्यवस्था पाहता, लसीकरणानंतरच्या दुष्परिणामांची चौकशी करण्यासाठी न्यायालयाकडून स्वतंत्र समिती स्थापन करण्याची गरज नाही. या निर्णयाचा अर्थ असा नाही की कोणतीही व्यक्ती कायद्याचा आधार घेऊ शकत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, नुकसानभरपाई धोरण तयार करण्याचा अर्थ असा मानला जाणार नाही की भारत सरकारने किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने आपली चूक किंवा कायदेशीर जबाबदारी स्वीकारली आहे.लसीचा याच्याशी संबंध नाही इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोलने त्यांच्या अभ्यासात सांगितले की, देशात हृदयविकाराच्या झटक्याने होणाऱ्या अचानक मृत्यूंचा कोविड लसीशी थेट संबंध नाही. हा अभ्यास १८ ते ४५ वयोगटातील लोकांच्या अचानक मृत्यूवर आधारित आहे. आरोग्य मंत्रालयाने अभ्यासात म्हटले आहे की, भारताची कोविड लस सुरक्षित आणि प्रभावी आहे. यामुळे होणारे गंभीर दुष्परिणाम दुर्मिळ आहेत. अभ्यासात असे म्हटले आहे की, अचानक झालेल्या मृत्यूंची इतर कारणे असू शकतात. यामध्ये आनुवंशिकता, जीवनशैली, आधीपासून असलेले आजार आणि कोविडनंतरच्या गुंतागुंतीचा समावेश आहे. भारतात दोन कोविड लसी विकसित झाल्या होत्या. भारत बायोटेकने कउटफ च्या सहकार्याने कोव्हॅक्सिनची निर्मिती केली होती. तर, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने ब्रिटिश कंपनी स्ट्राझेनेकाच्या फॉर्म्युल्याने कोविशील्ड बनवली होती.

-------------

### काँग्रेस-वंचितचा २३ रोजी आरएसएस

नाही, तर देशाचे सार्वभौमत्वही गहाण ठेवण्यात आले आहे. आर्थिक बाजारपेठ सरेंडर करण्यात आली आहे, तसेच राजकीय निर्णय घेण्याची शक्तीही दुसऱ्यांच्या प्रभावाखाली गेली आहे. अमेरिकेने भारताला केवळ ३० दिवसांसाठी पेट्रोलियम उत्पादने खरेदी करण्याची परवानगी दिल्याची बाब देशाच्या धोरणात्मक स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते असा मुद्दाही उपस्थित केला. पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, या सर्व घडामोडींमुळे भारताची राजकीय स्वायत्तता अमेरिकेकडे गहाण ठेवली गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत देशाच्या हिताचे प्रश्न उपस्थित करणे आवश्यक आहे. त्यामुळे २३ मार्च रोजी नागपूर येथील आरएसएस मुख्यालयासमोर धरणे आंदोलन आयोजित केले जात आहे. आरएसएसला आम्ही विचारणार आहोत की, अशा प्रकारच्या दबावाखाली असलेल्या व्यक्तीला तुम्ही देशाच्या पंतप्रधानपदी कसे ठेवू शकता, असा सवालही यावेळी केला. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी मध्यमवर्गीय नागरिकांनाही या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करत पुढे म्हणाले की, देशाच्या आर्थिक निर्णयांमुळे सर्वसामान्य जनतेवर गंभीर परिणाम होऊ शकतात आणि बँकिंग क्षेत्रासह अनेक क्षेत्रांमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे दरम्यान, या बैठकीत काँग्रेस पक्षानेही आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले की, बाळासाहेबांनी मांडलेली भूमिका ही काळाची गरज आहे. त्यांच्या नेतृत्वात २३ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनाला काँग्रेस पक्षाचा पूर्ण पाठिंबा राहील. त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या कार्यक्रमात काँग्रेस सक्रियपणे सहभागी होईल. तसेच हर्षवर्धन सपकाळ पुढे बोलताना म्हणाले की, मोदींवर अनेक आरोप केले जातात, पण त्याबाबत ठोस पुरावे किंवा ठोस कारवाई अद्याप कुठल्याही विरोधी पक्षाकडून पुढे आलेली दिसत नाही. १० मार्चच्या बैठकीत या आंदोलनाची रूपरेषा, रणनीती आणि व्यापक संघटनात्मक तयारी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, २३ मार्च रोजी नागपूर येथे मोठ्या प्रमाणात निषेध आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली. यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आम आदमी पार्टीचे प्रवक्ते सुदेश पटेल, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आमिर अब्दुल काझी, वंचित बहुजना आघाडीच्या राज्य प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते आणि सुमित आनंद हे उपस्थित होते.

-------------

### लाडक्या बहिणींना धक्का

आली आहे. लाडकी बहीण ही योजना सर्वच महिलांसाठी फायद्याची ठरताना दिसत आहे. सुरुवातीला कमी कागदपत्रांच्या आधारे मोठ्या संख्येने महिलांनी अर्ज केले आणि त्यांना काही महिने लाभही मिळाला. मात्र, डिसेंबर २०२४ पासून पात्रतेची सविस्तर तपासणी सुरू करण्यात आली. या योजनेत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असणे अनिवार्य आहे. आता ई-केवायसीद्वारे कुटुंबाच्या वास्तविक उत्पन्नाची पडताळणी केली जात आहे. कारवाई टाळण्यासाठी अनेक महिलांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही, असे सांगितले जात आहे. सरकारने ई-केवायसी करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च निश्चित केली आहे. १ एप्रिलपासून केवळ त्याच महिलांना दरमहा १५०० रुपये मिळतील, ज्या सर्व पात्रता निकष पूर्ण करतील. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले की, सर्व लाभार्थ्यांची अंगणवाडी सेविकांमार्फत तपासणी करण्यात आली असून, पात्र महिलांनाच पुढे योजनेचा लाभ दिला जाईल.

-----------

### सोशल मीडियावरील बदनामीला

कायद्यात बदल करण्यासंदर्भात अभ्यास करण्यात यंईल. समाजातील सर्व स्तरांतील लोकांना सायबर गुन्ह्यांचा सामना करावा लागत असला, तरी महिलांना होणारा त्रास विशेषतः गंभीर आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी कायद्यात ठोस तरतुदी सुचवण्याचे निर्देश समितीला देण्यात येतील. असेही सांगितले.

---------

### समान नागरी संहिता लागू

विचार करावा. यावर सरन्यायाधीश सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले की, शरियत कायदा रद्द केल्यास मुस्लिम वारसाहक्कासंबंधी कोणताही वैधानिक कायदा शिल्लक राहणार नाही आणि त्यामुळे कायदेशीर पोकळी निर्माण होऊ शकते. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सांगितले की, ''सुधारणांच्या अति घाईत आपण ज्या महिलांच्या हितासाठी प्रयत्न करत आहोत, त्यांनाच सध्यापेक्षा कमी हक्क मिळण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. शरियत कायदा रद्द झाल्यास अनावश्यक कायदेशीर पोकळी निर्माण होईल.'' न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनीही या मुद्द्यावर भाष्य करताना सांगितले की, ''भेदभावाबाबत तुमचा मुद्दा मजबूत आहे; मात्र या विषयावर निर्णय घेणे हे विधिमंडळाच्या अधिकारात येते. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार समान नागरी संहिता लागू करण्याचा अधिकारही विधिमंडळालाच आहे. एकपत्नी एकपतीचा नियम सर्व समुदायांमध्ये समानरित्या लागू होत नाही. ''मग सर्व द्विविवाहांना असंवैधानिक ठरविण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का?'' असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे या विषयावर विधिमंडळाच्या निर्णयाची वाट पाहणे योग्य ठरेल, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही अनेकदा केंद्र सरकारला समान नागरी संहिता लागू करण्याबाबत विचार करण्याची सूचना केली असल्याचेही सुनावणीदरम्यान खंडपीठाकडून यावेळी नमूद करण्यात आले.

----------

### अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचे

विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, लातूर विभागीय सचिव तथा प्रमुख संयोजक सचिन शिवशेट्टे, संभाजीनगर विभागीय सचिव रवी उबाळे, संयोजन समितीचे युवराज धोत्रे आदिंनी केले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ११ मार्च २०२६



## थोडक्यात



आष्टी शहरामध्येमध्ये पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब,मा. उपविभाग पोलीस अधिकारी श्री. हानपुडे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे आष्टी येथील पोलीस निरीक्षक श्री.शरद भुतेकर यांच्या आदेशाने आष्टी येथील ट्राफिक पोलिस अंमलदार सचिन क्षीरसागर व नागेशराव लोमटे यांनी आष्टी शहरात कर्ण कर्कश( मोठ्या आवाजाचे) सायलेन्सर असलेल्या बुलेट चे सायलेन्सर काढून त्यावरती मोटार वाहन कायद्याप्रमाणे दंड आकारण्यात आला आहे.





आष्टी : न्यायालयातील प्रसिद्ध ज्येष्ठ विधीज्ञ, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष ताहेर साहेब व प्रसिद्ध क्रिमिनल लॉयर बाळासाहेब मोरे यांना राज्य लोकतंत्र डायरी भेट देताना.

## बीडमध्ये रमजान ईदसाठी ईद बाजार!







बीड । प्रतिनिधी

रमजान ईदच्या निमित्ताने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडागण (मल्टीपर्पज) मैदानावर भव्य ईद बाजार भरविण्याचा निर्णय घेतला असून, नागरिकांकडून याचे जोरदार कौतुक होत आहे. नियोजनबद्ध पद्धतीने सजवलेल्या या बाजारपेठेत २०२ गाळ्यांची व्यवस्था करण्यात आली असून, ईदसाठी लागणारी सर्व वस्तू एकाच ठिकाणी मिळणार आहे.महिलांसाठी विशेष आकर्षण असलेल्या या बाजारात फक्त खरेदीच नव्हे, तर रेस्टॉरंटची सुविधाही उपलब्ध केली आहे. लहान मुलांसाठी झुले, खेळणी आणि आनंदनगरीची मजा ठरणार आहे. बाजार सुरळीत चालावा यासाठी पोलिस बंदोबस्त, १०० ते १५० स्वयंसेवकांची टीम आणि महिलांसह मुलांच्या सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेण्यात आली आहे.हा बाजार ११ मार्चपासून सुरू होणार असून, ईद संपल्यानंतरही पाच दिवस चालणार आहे. बुकिंग सुरू असून, नागरिकांनी एकाच ठिकाणी खरेदी करून आनंदनगरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बरकत पठाण, शेख वसीम, शेख समीर जहीर यांनी केले आहे.

# सावित्रीमाईंच्या संघर्षाची जिवंत कहाणी ; मेघना झुंझम यांच्या एकपात्री प्रयोगाने प्रेक्षक भारावले

आष्टी । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणादायी सांस्कृतिक कार्यक्रमात 'मी तुमची सावित्रीबाई फुले' या प्रभावी एकपात्री प्रयोगाने उपस्थितांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या प्रयोगात सौ. मेघना झुंझम (भिंबरपाटील) यांनी आपल्या दमदार अभिनयातून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाची प्रेरणादायी गाथा सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.

आष्टी पंचायत समितीच्या प्रांगणात सोमवार, दि. ९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम पार पडला. मुंबई महानंद संचालिका सौ. प्राजक्ता ताई सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. परिसरातील महिलांसाठी हा कार्यक्रम प्रेरणा, मनोरंजन आणि समाजप्रबोधनाचा संगम ठरला. एकपात्री प्रयोगाद्वारे सौ.मेघना झुंझम यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील संघर्ष, स्त्री शिक्षणासाठी केलेले महान कार्य आणि समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य अत्यंत



प्रभावीपणे सादर केले. पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू करणाऱ्या सावित्रीमाईंचा इतिहास, समाजाच्या विरोधाला न जुमानता त्यांनी केलेली लढाई आणि स्त्री शिक्षणाचा लावलेला दीप या प्रयोगातून जिवंत झाला.

या सादरीकरणाने उपस्थितांना कधी भावूक केले तर कधी हसवले. स्त्री-पुरुष समानता, स्त्रीशक्ती, धाडस आणि शिक्षणाचे महत्त्व यांचा जागर या प्रयोगातून करण्यात आला. सावित्रीमाईंच्या कार्याची आठवण करून देत समाजात परिवर्तनाची प्रेरणा देणारा हा प्रयोग उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला.

यावेळी महिला दिनानिमित्त आयोजित 'खेळ पैठणी'च्या ''होम मिनिस्टर'' स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित कार्यक्रमाचा मनमुराद आस्वाद घेतला.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे :

प्रथम सुमित्रा संकेत गायकवाड (आकर्षक पैठणी व फ्रिज, सन्मानचिन्ह) द्वितीय ऋतुजा लोंढे (आकर्षक पैठणी व वॉशिंग मशीन, सन्मानचिन्ह) तृतीय मनीषा शेळके (आकर्षक पैठणी व ओव्हन, सन्मानचिन्ह) उत्तेजनार्थ संगीता हराळ (आकर्षक पैठणी व राईस कुकर, सन्मानचिन्ह) पाचवा योगिता रेडेकर (इंडक्शन शेगडी, सन्मानचिन्ह) सहावा रेश्मा शास्त्री (टेबल फॅन, सन्मानचिन्ह) सातवा इलेक्ट्रिक ब्लेंडर (सन्मानचिन्ह) आठवा संगीता साबळे (केतली, सन्मानचिन्ह),

नववा ज्योती प्रविण पोकळे (इस्त्री, सन्मानचिन्ह),

दहावा जया वारंगुळे (टिफिन बॉक्स, सन्मानचिन्ह) देऊन विजेत्या महिलांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका दूध संघ,आष्टी नगरपंचायत कार्यालय,कासारी, मुर्शदपुर, शिंदेवाडी ग्रामपंचायत पदाधिकारी,पत्रकार,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# विनयभंग करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपीस सहा महिने कारावासाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

दिनांक. २९/०३/२०२२ रोजी आरोपी याने अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून, छेडछाड व विनयभंग करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गेवराई तालुक्यातील रा. दिमाखवाडी या गावचा रहिवासी असलेला आरोपी नामे. मनेश उर्फ बाळु गंगाधर जायगुडे यास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ व्यंकटेश एच. पाटवदकर साहेब यांनी आरोपीला दोषी ठरवून ६ महिने करावास व १,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास एवढ्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

दिनांक २९/०३/२०२२ रोजी सकाळी ०८.०० ते ८.४५



वाजण्याच्या सुमारास घटना घडली. माझी मुलगी बीड येथे शाळेमध्ये शिक्षणासाठी असतांना व तिचे गावी येथे मागील सहा महिन्यापासुन तिचा सतत पाठलाग करून तिची छेडछाड करून तु मला खुप आवडतेस असे म्हणुन तिचा विनयभंग करून तिची गावात बदनामी केलयाचे आरोपीचे त्रासाला कंटाळुन तिने लोखंडी अंगलला दोरीने गळफास घेवुन आत्महत्या केली. पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन गेवराई येथे आरोपी विरूध्द कलम ३०५, ३५४, ३५४-ड भादवी आणि कलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील उपविभागीय अधिकारी गेवराई श्री. स्पप्निल आर. राठोड यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर प्रकरणी सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश - १ व्यंकटेश एच. पाटवदकर साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०९ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ व्यंकटेश एच. पाटवदकर साहेब यांनी आरोपी यास कलम ३०५, ३५४, ३५४-ड भादवी आणि कलम १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे ६ महिने साधा करावास व १,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. गेवराई श्री. स्पप्निल आर. राठोड व कोर्ट पैरवी अधिकारी पोष्ट गव्हाणे, सपो पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती. सविता चव्हाण यांनी सहकार्य केले.

## पान ६ वरुन...

### पोलिस-महसूल कर्मचाऱ्यांच्या

व विभागीय चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय गोदाकाठ परिसरातील अवैध वाळू साठा जप्त करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, तसेच जिल्ह्यात लागू असलेल्या महाराष्ट्र वाळू उत्खनन धोरणाचे पालन होते का याचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणाबाबत यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांची नावे आणि मोबाईल क्रमांक जिल्हा प्रशासनाला लेखी स्वरूपात देण्यात आले होते. मात्र अपेक्षित अशी निष्पक्ष चौकशी झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आता या गंभीर तक्रारीवर पोलीस अधीक्षक बीड कोणती भूमिका घेतात आणि सत्य जनतेसमोर आणतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर किंवा गोदावरी नदी पात्रात लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### आजच्या तरूणांनी शिवरायांचे

राष्ट्रभक्ती ची प्रेरणा निर्माण झाली.

यावेळी परमेश्वर सातपुते सर यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श आपल्या जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. तसेच शिवजयंतीच्या निमित्ताने असा प्रेरणादायी उपक्रम राबवल्याबद्दल युवानेते विद्यानाथजी तोडेकर व सर्व गावकऱ्यांचे त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुंदर भाऊ चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव यशवंत भाऊ कदम, गावचे सरपंच ज्ञानेश्वर माऊली शिंदे, तुळशीदास भाऊ पवार यांनीही शिवचरित्रावरती मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कुक्कडगावचे अध्यक्ष मच्छिंद्रजी शिंदे, राम भैय्या नवले, सिद्धार्थ शिंदे, सनराईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, युवानेते राजाभाऊ चव्हाण, ग्रा.स.लक्ष्मण घिगे,दत्ता पवार, प्रेमराज बचाटे,सुरेश तोडेकर, बापुराव जिजा चव्हाण,वैजीनाथ डोंगरे,बंडू काका तोडेकर,प्रल्हाद तोडेकर,आसाराम तोडेकर,लक्ष्मण चव्हाण,अमर तोडेकर,चांगुजी चव्हाण,भागवत घिगे,महादेव तोडेकर,दिलीप चव्हाण,अक्षय चव्हाण,मदन चव्हाण,माऊली सावंत, चंद्रसेन सावंत तसेच सर्व सहकारी व गावकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महिलादिनी सांभाळला

आप-आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडत शालेय कामकाज आनंददायी आणि उत्साही वातावरणामध्ये पार पाडले.जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने हा नवोपक्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री.सखाराम वनवे सर यांच्या संकल्पनेतून साकारला.या उपक्रमाचे छत्रपती संभाजीनगर प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती चेतना मोरे मॅडम,पालक अधिकारी डॉ. उद्धव वायाळ सर तसेच शिक्षण अधिकारी श्री.गजानन बनसोडे सर व प्रकल्पाचे इतर सर्व अधिकारी वर्गाने,या राबवलेल्या उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच अभिनंदन करून,असेच नवनवीन शालेय उपक्रम राबवण्यासाठी सर्वोतपरी मदत करण्यासाठी प्रशासन नेहमी तुमच्या पाठीशी आहे. हा उपक्रम राबवण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी परिश्रम घेतले.

### सातबारा कोरा करण्याचे

ही रक्कम २ लाख रुपये करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. ५० हजार रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या व्याजातच संपून जाते, त्यामुळे त्याचा फारसा लाभ होत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अनेक बँकांनी चुकीची माहिती देऊन शेतकऱ्यांचे कर्ज नवे-जुने करून घेतले असून ते कर्ज आजही शेतकऱ्यांच्या बोकांडी आहे. त्यामुळे ते कर्जही शासनाने माफ करावे, अशी मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली. याबाबत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, शेतकरी नेते बाळासाहेब मोरे पाटील, युवा शेतकरी नेते अशोक ढोले पाटील, शेतकरी पुत्र संदीप नवले, खाजा भाई पठाण, नजीब भाई, राजू वीर, अर्जुन सोनवणे आदी उपस्थित होते.

### संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा

अश्विनी तोडकर ,तृतीय क्रमांक जना चौधरे यांनी मिळवला. प्रथम क्रमांक विजेत्यास पाणी जार, द्वितीय क्रमांक विजेत्यास साडी आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला फोटो फ्रेम हे बक्षीस देण्यात आली. सदरील स्पर्धेचा महिलांनी मनसोक्तपणे आनंद लुटला.असे कार्यक्रम शाळेत नेहमी घेतले जावेत व आम्हाला त्यामध्ये सहभागी होता येईल अशी विनंती महिला पालकांनी केली.सदरील कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी माळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व महिला शिक्षकांनी अचक परिश्रम घेतले सर्व विजेत्या महिलांचे शाळेचे वतीने व संस्थेच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

### माणुसकीचा इतिहास निर्माण

वैशिष्ट्यपूर्ण सोहळा ठरला आहे.डॉ. शिवानी ही पत्रकार उत्तमराव बोडके यांची कन्या आहे.डॉ.सत्यजित हे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांचे चिरंजीव आहेत.अत्यंत संस्कारक्षम आणि प्रेरणा घेण्याइतपत ही जोडी आजच्या युवकांसाठी ठरते आहे.उभयतांच्या संस्कार मय कुटुंबातून रविवारी महिला दिनाच्या ८ मार्च रोजी सर्वांच्या आशीर्वादाने आष्टी येथील मंगल कार्यालयात संपन्न झाला.

लग्नातील मंगलमय वातावरण... सुमधुर आवाजातील सनई चौघडे... भावी जीवनासाठी दिला जाणाऱ्या प्रचंड शुभेच्छा... हळदी साखरपुडा... वधु-वरांचे रोमांचकारी आगमन... हे प्रसंग अत्यंत देखणे, अल्हाददायक आणि डोळ्यांना दीपणारे ठरले.

खरं तर, विवाह दोन विचार आणि दोन संस्कृतीचा संगम असतो.बोडखे आणि विधाते परिवाराच्या या विवाहाच्या रुपाने सुंदर असे शुभमंगल आणि भावी आयुष्यासाठी डॉ. सत्यजित आणि डॉ. शिवानी च्या माध्यमातून भावी आयुष्याची गोड सुरुवात झाली आहे. या शुभविवाह सोहळ्यासाठी आशीर्वाद देताना आष्टी,पाटोदा, शिरूरचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी पत्रकार उत्तम बोडखे आणि प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या गोड वाणीचा गोड बोले असा विनोदाने आवर्जून उल्लेख करत त्यांच्यामुळे प्रचंड अफाट आशीर्वाद देण्यासाठी जमलेला वऱ्हाडी मंडळींच्या उपस्थितीचा विशेष उल्लेख केला.अन्य राजकीय नेते कार्यकर्ते,अधिकारी आणि संत महंतांनी दिलेले आशीर्वाद, सबंध पत्रकार बांधवांची घरातील लग्न असल्या सारखी स्वागता साठीची धावपळ आणि राजकीय सामाजिक धार्मिक वैचारिक शैक्षणिक आर्थिक आणि माध्यमिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रचंड उपस्थिती हे या विवाह सोहळ्याचे वैशिष्ट्य ठरले.आ. सुरेश आण्णा धस,माजी आमदार भीमराव धोंडे,माजी आ. दरेकरनाना,माजी आ.बाळासाहेब आजबे काका,महबूबभाई शेख,देविदास आबा धस, ह.भ.प. रंधवे बापू, ह.भ.प. राधाताई सानप, ह.भ.प.सोनाली दीदी यांच्यासह असंख्य विविध कुलगुरू, प्राचार्य, प्राध्यापक, डॉक्टर, वकील व विविध क्षेत्रातील मान्यवर यांची मांदियाळी अभुतपूर्व ठरली.

# ऑनेस्टी पब्लिक स्कूल येथे महिला दिनानिमित्त स्वावलंबी व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा संपन्न



माजलगाव । प्रतिनिधी

येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल शाखा शिवाजीनगर येथे महिला दिनानिमित्त सौंदर्य व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.. या कार्यक्रमासाठी डॉ. मानसी देशमुख, डॉ. प्रीती रुद्रवार, प्रिया मालानी, ओम शांती केंद्राच्या अनिता दीदी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उद्देश शाळेच्या प्रिन्सिपल युनिट एक च्या गौरी कानडे यांनी केले. यावेळी उपस्थित माता पालकांना स्वतःच्या आरोग्याची काळजी व प्रतिबंधक लसीकरणाची माहिती डॉ. मानसी देशमुख यांनी दिली. मनुष्याचे आत्मस्वरूप ,व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी व अध्यात्माची जोड द्यावी असे अनिता दीदी यांनी सांगितले. व्यक्तिमत्व विकासामध्ये स्त्रीचे योगदान खूप मोलाचे आहे व श्यामची आई याचा संदर्भ देऊन प्रिया मालानी यांनी प्रतिपादन केले. आकांक्षा नाईकनवरे यांनी सौंदर्य कला प्रात्यक्षिक दाखवून माता पालकांना चांगल्या प्रतीच्या प्रसाधनेची माहिती दिली.. यावेळी शाळेच्या माता पालकांच्या घेण्यात आलेल्या स्पर्धेचे बक्षीस वितरण व कर्तुत्वान महिलांचा सन्मान ऑनेस्टी शाळेच्या संचालिका सौ सत्यभामा वाघ यांच्या उपस्थितीत ब्रह्मकुमारी अनिता दीदी यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यक्षीय समारोप शाळेच्या प्रिन्सिपल अमृता तोर यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली यादव यांनी केले तर आभार प्रदर्शन अनुजा गिलानकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ, सुनिता वैरागे, सुशीला जोशी, मीरा चिंचोलकर, सोनाली नाईकवाडे, जयश्री जाधव, सरिता सोनवणे, सुनिता सोळंके, दीपा शिंदे, श्रुती कुलकर्णी, राजश्री महामुनी , जवकर ताई यांनी कार्य केले.

# एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावांना काँक्रीट रस्त्याने जोडण्याचा शासनाचा मोठा निर्णय -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक १० ३ २०२६ राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील वाहतूक सुविधा मजबूत करण्यासाठी शासनाकडून मोठ्या पायाभूत प्रकल्पाची घोषणा करण्यात आली आहे २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात रस्ते, रेल्वे, मेट्रो, आणि विमानतळ विकासासाठी अनेक महत्त्वाच्या योजनेची माहिती देण्यात आली आहे ग्रामीण भागातील रस्ते सुधारण्यापासून ते मोठ्या शहरांमधील मेट्रो आणि महामार्ग प्रकल्पांतर्गत विविध उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे हजारो गावांना काँक्रीट रस्त्याने जोडण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. राज्यातील एक हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावामध्ये शासन हा कार्यक्रम राबवणार आहे या योजनेसाठी सुमारे ४५०० कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार असून या प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेचे आर्थिक मदत घेतली जाणार आहे ग्रामीण भागातील वाहतूक सुलभ करण्या सोबतच शेतमालाची वाहतूक आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. पुणे - लोणावळा रेल्वे मार्ग विस्ताराला मंजुरी पुणे आणि लोणावळा दरम्यान वाढत्या रेल्वे वाहतुकीचा विचार करून तिसरी आणि चौथी रेल्वे मार्गिका करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे या प्रकल्पासाठी सुमारे




पाच हजार १०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या रेल्वे मार्गामुळे औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाच्या पिंपरी चिंचवड आणि तळेगाव दाभाडे परिसरला मोठा फायदा होणार आहे.उद्योगधंद्याच्या वाहतुकीसाठी तसेच प्रवाशांच्या सोयीसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय कल्याण ते लातूर दरम्यान ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग उभारण्याचा प्रस्ताव आहे तसेच पुणे ते शिरूर या ५३ किलोमीटर लांबीच्या उन्नत मार्गासाठी सुमारे ७५१४ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे.तळेगाव ते चाकण दरम्यान उन्नत मार्गाचे कामे सुरू करण्यात येणार आहे पुणे ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान जलद प्रवासासाठी शिरूर ते सुरू छत्रपती संभाजी नगर या सुमारे १९२ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे तसेच छत्रपती संभाजी नगर विमानतळ ते वाळूज एमआयडीसी दरम्यान उन्नत मार्ग दोन टप्प्यांत उभारला जाणार आहे. अशा वेगवेगळ्या जनतेच्या हिताच्या योजना राबविण्यात येणार असल्याचे शासनाने सांगितले तरी शासनाचे जनतेच्या हिताचे व राज्याच्या विकासाचे निर्णय घेतल्यामुळे ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शासनाच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल कौतुक केले जात आहे.

# हरवलेल्या बालकाचा विहिरीत आढळला मृतदेह

दिंद्रुड । प्रतिनिधी

शिरसाळा पोलीस हद्दीतील जवळा येथे सोमवारी सायंकाळी हरवलेल्या बालकाचा मृतदेह मंगळवारी सकाळी एका विहिरीत आढळल्याने खळबळ उडाली. फिरंगी चिंचा खाण्याच्या नादात हा बालक विहिरीत पडला असावा असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.



असेफ समद शेख (वय ४ वर्ष) हा बालक सोमवारी सायंकाळी ५ वाजे दरम्यान पासून बेपत्ता होता. नातेवाईक, ग्रामस्थ व पोलिसांनी सोमवारी रात्रभर त्याचा सर्वत्र शोध घेतला मात्र तो सापडला नव्हता. दरम्यान मंगळवारी सकाळी सिरसाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ दहिफळे, पोलीस उपनिरीक्षक आनंद जाधव सह पोलीस कर्मचाऱ्यांनी व सरपंच त्रिंबक साबळें सह ग्रामस्थांनी जवळा गावातील पडकी घरे,शाळा खोल्या,खेळण्याची ठिकाणे सह सर्व विहिरी तपासत असताना घरापासून जवळच असलेल्या सुरेश मिसाळ यांच्या शेतातील विहिरीत त्याचे प्रेत बुडालेल्या अवस्थेत निदर्शनास आले, प्रेताच्या उत्तरिय तपासणीसाठी शिरसाळा पोलिसांनी धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. शव विच्छेदनानंतर जवळा येथे मंगळवारी सायंकाळी शोकाकुल वातावरणात असेफचा दफनविधी करण्यात आला.या घटनेनंतर जवळा गावात शोककळा पसरली. पालकांनी आपल्या मुलांकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.


## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड**
**(दंड विभाग)**

दूरध्वनी ०२४४७-२६२१४१ दिनांक ०९.०१.२०२६
२०२५/दंड/कावि-
विषय-जन्म नोंद आदेश मिळणे बाबत,
संदर्भ: -१. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ ईऑ ९९११८ १/प्र.क्र.२२/कु.क.नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार अदनान खलील शेख रा.इस्लामपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक १७.१२.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार अदनान खलील शेख रा. इस्लामपुरा गेवराई ता.गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक १२.१२.२००४ रोजी नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयात संदर्भीय अर्जदाराने विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ईऑ ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म मृत्यु ठीकाणचा व रहीवासींचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक राहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी गेवराई**

## जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई जि. बीड**
**(दंड विभाग)**

दूरध्वनी ०२४४७-२६२१४१ दिनांक ०९.०२.२०२६
२०२५/दंड/कावि-
विषय-जन्म नोंद आदेश मिळणे बाबत,
संदर्भ: -१. शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ ईऑ ९९११८ १/प्र.क्र.२२/कु.क.नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५
२. अर्जदार मुजमील जमिल शेख रा.गेवराई ता.गेवराई यांचा अर्ज दिनांक १७.१२.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क ०२ नूसार अर्जदार मुजमील जमिल शेख रा. गेवराई ता. गेवराई जि.बीड यांनी अर्ज देवून अर्जदार यांचा जन्म दिनांक १९.०१.२००१ रोजी गेवराई येथे नोंद करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात जन्म आदेश मिळणे बाबत या कार्यालयात संदर्भीय अर्जादाने विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उकत अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनो २५२५/ईऑ ९९११८१)/प्र.क्र.२२/कु.क नविन मंत्रालय मुबई दिनांक १२.०३.२०२५ नुसार प्रकरणात पो स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक जन्म मृत्यु ठीकाणचा व रहीवासींचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी गेवराई यांनी अर्जदाराचे स्थानीक राहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी

**स्वाक्षरित/-**
**तालुका दंडाधिकारी गेवराई**

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
बुधवार दि.११ मार्च २०२६
४



# जनावरांच्या जीवघेण्या फऱ्या रोगाच्या आजारावरील उपाय!

महाराष्ट्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन घेतले जाते. मात्र डेअरी व्यवसाय करताना जनावरांच्या आहारासोबतच त्यांच्या आरोग्याकडे देखील लक्ष देणे तितकेच आवश्यक असते. दुधाळ जनावरांना शेतकरी खूप जपत असतात. मात्र, कधी-कधी जनावरांकडे दुर्लक्ष झाल्यास, ते अनेक आजारांचे शिकार होतात. जनावरांना होणारा फऱ्या रोग हा देखील त्यापैकीच एक आहे. फऱ्या रोग हा जनावरांना होणारा जीवघेणा आजार असून, त्याच्यामुळे शेतकऱ्यांचे दुधाळ जनावर दगावण्याची देखील भीती असते. त्यामुळे हा आजार नेमका काय आहे? या आजाराची लक्षणे काय आहेत? आणि या आजारावर नेमके काय उपाय आहेत? याबाबत सविस्तरपणे जाणून घेणे आवश्यक आहे.



असा होतो फऱ्या रोग : फऱ्या रोगास प्रामुख्याने अवकाळी पाऊस किंवा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरे बळी पडतात. हा रोग मातीमध्ये असलेल्या क्लोस्ट्रीडियम चाउवोई या जिवाणूमुळे जनावरांना होतो. हा जिवाणू मातीमध्ये वर्षानुवर्षे जिवंत असतो. पाऊस झाल्यानंतर जनावरास शरीरावर किंवा पायांना थोडी जरी जखम होऊन रक्त निघालेले असेल तर मातीमधील हा जिवाणू त्या जखमेच्या ठिकाणाहून जनावरास बाधित करतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या दुधाळ जनावरांना जपणे हा त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे. इतकेच नाही तर पावसाळ्याच्या दिवसांमध्ये देखील जनावरांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव अधिक असल्याचे पाहायला मिळते.

काय आहेत या रोगाची लक्षणे? जनावरांना हा फऱ्या रोग झाल्यास त्यांचे शरीराचे तापमान १०७ डिग्रीपर्यंत पोहचते. अर्थात जनावरास तीव्र ताप येतो. या आजारात संबंधित जनावर चारा किंवा पाणी पिणे सोडते. याशिवाय हा रोग झालेल्या जनावराचे सर्व मागील पुढील पाय सुजतात. ज्यामुळे संबंधित दुधाळ जनावर हे लंगडत चालते. किंवा मग अशा जनावरास सुजलेल्या पायांमुळे कधी-कधी चालता देखील येत नाही. कारण या आजारामुळे जनावरास सर्वात जास्त त्रास हा पायांना होत असतो. कधी-कधी या फऱ्या रोगामुळे संबंधित जनावराचा दोन किंवा तीन दिवसांमध्ये मृत्यू देखील होतो.

आजारावरील उपाय : जनावरांना होणारा फऱ्या हा असा रोग आहे. जो झाल्यास संबंधित जनावरावर उपचार करणे खूप कठीण असते. ज्यामुळे दूध उत्पादकांनी अवकाळी पाऊस किंवा पावसाच्या वातावरणात आपल्या जनावरांची काळजी घेणे हाच त्यावरील सर्वोत्तम उपाय आहे. आणि काळजी घेऊनही या रोगाने जनावरास ग्रासल्यास, लक्षणे दिसताच आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जाऊन तात्काळ या रोगाचा इलाज व लसीकरण करून घ्यावे. जेणेकरून अशा जनावरास अधिक त्रास न होता. ते लवकर बरे होण्यास मदत होईल.

## तापट स्वभावाची, 'तोडा म्हैस', जाणून घ्या विशेषता!



तामिळनाडू राज्यात आढळणारी 'तोडा म्हैस' तेथील आदिवासी समाजासाठी महत्त्वाची आहे. तोडा या आदिवासी जमातीच्या सांस्कृतिक जीवनामध्ये विशेषतः जन्म, मृत्यू, लग्नकार्य इ. प्रसंगांच्या वेळी या जातीच्या म्हशींना विशेष स्थान आहे.

उगम स्थान : तोडा म्हैस ही तामिळनाडू राज्यातील नीलगिरी टेकड्यांच्या टापूमध्ये आढळते. तोडा या आदिवासी जमातीकडून दूध उत्पादनांसाठी ही गाय पाळली जाते. या आदिवासी जमातीच्या नावावरून या म्हशीला तोडा हे नाव पडले असावे.

शरीर रचना : इतर म्हशींपेक्षा दिसायला ह्या अगदी वेगळ्या आहेत. शरीर (धड) लांब असून त्यांची छाती विस्तृत व भरदार असते. पाय आखूड पण मजबूत असतात व त्या चांगल्याच ताकदवान असतात. शिंगे लांब आणि अर्धगोलाकार आकारात बदलणारी असतात. शिंगे पायथ्याशी जाड असून प्रथम बाहेरच्या दिशेने वळून, थोडेसे खालच्या दिशेने जातात आणि वरच्या दिशेने बाहेर पडतात. शेवटी शिंगाचे टोक आतील बाजूस वळलेले असतात ज्यामुळे शिंगांचा वैशिष्ट्य पूर्णपणे चंद्रकोर आकार किंवा अर्धवर्तुळ बनतो. प्रौढ म्हशींमध्ये, कातडीचा मुख्य रंग भुरकट आणि राखाडी असतो. म्हशीचे वजन सुमारे ३८० किलोपर्यंत असते.

प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : जवळपास ४७ महिन्यात ही म्हैस प्रथम माजावर येते. सरासरी दूध देण्याचा कालावधी हा २०० ते २५० दिवसांचा असून एका वेतात ५०० लिटर पर्यंत दूध देतात. दिवसाला ४.५ ते ७ लिटर दूध देतात.

विशेष माहिती : म्हशीची ही जात जास्त पाऊस आणि जास्त आर्द्रता असलेल्या भागात चांगली वाढते. या म्हशीचा स्वभाव तापट व खुनशी असतो. वन्य म्हशीप्रमाणे या माणसावर चाल करून जातात. त्यामुळे सावध राहावे लागते. सध्या या म्हशींची लोकसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. आदिवासी भागात ही म्हैस संख्येने १५०० पेक्षा कमी आहे.

## जनावरांमधील उष्माघात टाळण्यासाठी उपाय

उन्हाळ्यात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक झाल्यास जनावरांच्या शरीरातील उष्णता बाहेर टाकण्याची नैसर्गिक क्षमता कमी होते. परिणामी जनावरांमध्ये उष्णताजन्य ताण निर्माण होतो. याचा थेट परिणाम दूध उत्पादन, वाढ, प्रजनन व एकूण आरोग्यावर होतो. सामन्यात: जनावरांच्या शरीराचे तापमान हे सुमारे ३८ ते ३९ अंश सेल्सिअस इतके असते. जनावरांच्या शरीराचे बाह्य तापमान जास्त झाल्यास किंवा आर्द्रता वाढल्यास जनावरांना शरीरातील उष्णता बाहेर जाणे कठीण होते. अशावेळी जनावरे श्वसनगती वाढवून, तोंड उघडे ठेवून श्वास घेणे किंवा घामावाटे शरीराचे तापमान नियंत्रित करण्यासाठी प्रयत्न करतात. परंतु दीर्घकाळ उष्णता राहिल्यास ताण वाढतो.



उष्माघाताची लक्षणे :सर्वसाधारणपणे १० ते ३३ अंश सेल्सिअस तापमान जनावरांसाठी योग्य मानले जाते. संकरित जनावरांसाठी २४ ते २६ अंश सेल्सिअस, देशी जनावरे, म्हशींसाठी सुमारे ३३ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान योग्य मानले जाते. उन्हाळ्यात तापमान वाढ झाल्यानंतर जनावरे घामावाटे (स्वेदग्रंथीद्वारे) शरीराचे तापमान नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. तापमानातील चढ-उतार झाल्यानंतर जनावरांवर अतिरिक्त ताण येतो. जनावरांमध्ये शरीरात निर्माण होणारी उष्णता बाहेर टाकण्याची प्रक्रिया असते; परंतु उन्हाळ्यात वातावरणातील तापमान वाढल्यास ही उष्णता बाहेर टाकणे जनावरांमध्ये कठीण होते. याचा परिणाम जनावरांमधील उष्णता उत्सर्जन प्रणालीवर दिसून येतो. उन्हाळ्यात वातावरणातील वाढत्या तापमानामुळे जनावरांमध्ये संप्रेरक (हॉर्मोन्स) निर्मितीत बदल होतात. ज्यामुळे त्यांच्या उत्पादन, आरोग्य, आहार व प्रजनन क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. जनावरे उन्हाळ्यात वाढलेले तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी शरीरातील ऊर्जा व आहाराचा वापर करतात, ज्यामुळे जनावरे अस्वस्थ होतात. परिणामी, जनावरांमध्ये खाद्यसेवनाची मात्रा कमी होणे, तहान व भूक मंदावणे अशी लक्षणे दिसतात. उन्हाळ्यातील तापमान वाढीमुळे जनावरांची त्वचा कोरडी पडणे, डोळे लाल होऊन पाणी येणे इत्यादी लक्षणे दिसून येतात.

उष्माघात टाळण्यासाठी उपाययोजना :जनावरांना उन्हात उभे करू नये. त्यांना पुरेशी व जास्तीत जास्त सावलीची व्यवस्था करावी. उन्हाळ्यात जनावरांवर थेट सूर्यप्रकाश पडणार नाही याची काळजी घ्यावी. गोठा बांधताना छताची उंची जास्त ठेवावी. छताला पांढरा रंग द्यावा, त्यामुळे उष्णतेचे परावर्तन होऊन जनावरांवरील उष्णताजन्य ताण कमी होण्यास मदत होते.त्याचबरोबर गोठ्यातील तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी छतावर आच्छादन करावे. उन्हाळ्यात गोठ्यातील वातावरण थंड ठेवण्यासाठी योग्य वायुविजनाची व्यवस्था करावी. गोठ्यातील गरम हवा बाहेर जाण्यास व थंड हवा आत येण्यास पुरेशी जागा असावी. त्याचबरोबर गोठ्यात हवा सतत खेळती राहावी यासाठी पंखे बसवावेत. उन्हाळ्यात जनावरांना हालचाल करण्यासाठी गोठ्यात सरासरीपेक्षा अधिक जागा उपलब्ध करून द्यावी. ज्यामुळे शरीरातील उष्णता बाहेर काढण्यास जनावरांना मदत होते. गोठ्याच्या छतावर पाण्याचे स्प्रिंकलर किंवा फॉगर बसवावेत. त्यामुळे जनावरांचे शरीर थंड राहण्यास मदत होते. गोठ्याच्या बाहेरील बाजूस किंवा भोवताली ओले गोणपाट किंवा पाणी धरून ठेवणारे कापड लावावे, त्यामुळे बाहेरून येणारी गरम हवा थंड होते आणि आतील थंड हवा टिकून राहण्यास मदत होते. उन्हाळ्यात जनावरांना मुबलक प्रमाणात स्वच्छ व थंड पाणी गोठ्यामध्ये उपलब्ध करून द्यावे. जनावरांना जास्त चर्वण करावा लागणारा चारा सकाळी किंवा संध्याकाळी द्यावा, कारण चारा चघळताना जनावरांच्या शरीरात अतिरिक्त उष्णता निर्माण होते. उन्हाळ्यात उष्णताजन्य ताण सहन करण्यासाठी तसेच शरीरातील बिघडलेले क्षार संतुलित ठेवण्यासाठी जनावरांना पुरेशा प्रमाणात क्षार (मीठ) द्यावे.

## मसूर लागवड तंत्रज्ञान

कडधान्य पिकांमध्ये मसूरला महत्त्वाचे स्थान आहे. खिचडी, डाळ, डंपलिंग इत्यादींमध्ये मसूराचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. इतर डाळींप्रमाणेच मसूरमध्येही प्रथिने आणि जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. मसूरमध्ये २५ टक्के प्रथिने, १.३ टक्के चरबी, ३.२ टक्के फायबर आणि ५७ टक्के कार्बोहायड्रेट असतात. मसूरची शेती (मसूर की खेती) कमी खर्चात जास्त उत्पन्न देते. याच्या लागवडीसाठी पाण्याची गरजही खूप कमी आहे. भारतात मसूराची लागवड मध्य प्रदेश, छत्तीसगड, बिहार, उत्तर प्रदेश आणि राजस्थानमध्ये मुबलक प्रमाणात होते.

मसूर शेतीतील खर्च आणि कमाई :कोरडवाहू आणि पावसावर अवलंबून असलेल्या भागात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. भात, मका कापणीनंतर लगेचच त्याची लागवड केली जाते. मसूराची लवकर लागवड केल्यास जास्त नफा मिळतो. मसूर लागवडीसाठी कमी पाणी लागते. २५-२५ अंश सेंटीग्रेड तापमान यासाठी अनुकूल आहे.

शेतीसाठी उपयुक्त माती :कोणत्याही प्रकारच्या सुपीक जमिनीत मसूराची लागवड करता येते. पण चिकणमाती किंवा वालुकामय माती सर्वोत्तम आहे. मसूर लागवडीसाठी जमिनीचे मूल्य ४.२ ते ८.५ दरम्यान असावे. योग्य निचरा व्यवस्था असलेल्या काळ्या मातीत, चिकणमातीची माती आणि लॅटराइट मातीमध्ये याची चांगली लागवड करता येते. शेतकऱ्यांनी पाणी साचलेल्या शेतात लागवड करणे टाळावे.

शेतीची तयारी कशी करावी :शेत तयार करण्यासाठी पावसाळी पीक काढणीनंतर जमिनीतील उपलब्ध ओलाव्यानुसार २-३ वेळा नांगरणी करून जमीन बारीक करावी. यानंतर लगेच, फरात किंवा सारा चालवून फील्ड समतल करा. त्यामुळे शेतात



ओलावा टिकून राहतो. बिया सपाट जमिनीत एकसमान खोलीत पेरा. त्यामुळे बियाण्यांची बियाणे उगवण क्षमता सुधारते. शेत तयार करताना, पहिली नांगरणी करतानाच शेण घाला, म्हणजे नंतर जास्त खताची गरज भासणार नाही.

मसूराच्या सुधारित जाती :आपल्या देशात मसूराच्या अनेक प्रगत जाती विकसित झाल्या आहेत. यासाठी तुम्ही तुमच्या क्षेत्रानुसार कृषी विभाग किंवा कृषी विज्ञान केंद्राशी संपर्क साधावा. तिथे तुम्हाला अनुदानावर बियाणे मिळू शकते.एलएल ६९९, जेएल-३, जेएल-१, आयपीएल ८१, एल.४५९४, मल्लिका, पंत ४०७६, सीहोर ७४-३ या मसूराच्या सुधारित जातींमध्ये प्रमुख आहेत.

सिंचन आणि खत व्यवस्थापन :मसूरांना विशेष सिंचनाची आवश्यकता नसते. परंतु झाडांच्या वाढीसाठी जमिनीतील ओलावा आवश्यक आहे. शेंगा तयार झाल्यास किंवा शेंगामध्ये दाणे तयार झाल्यास हलके सिंचन फायदेशीर ठरते. जमिनीच्या गरजेनुसार सिंचन स्प्रिंकलरने किंवा फ्लो पद्धतीने करावे. जास्त सिंचनामुळे मसूर की फसलचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे जास्त पाणी देऊ नका. शेतकऱ्यांना पीक वाढवण्यापूर्वी माती परीक्षण करून घेण्याचा सल्ला दिला जातो. यावरून पिकाला योग्य प्रमाणात खत द्यावे लागते. शेताच्या माती परीक्षणानुसार खत व खते दिल्यास फायदा होतो. जर चांगले कुजलेले खत किंवा शेणखत उपलब्ध असेल तर ते ५ टन/हेक्टर या दराने शेतात चांगले मिसळा. रासायनिक खतामध्ये १५-२० किलो नायट्रोजन, ३०-४० किलो स्फुर आणि २० किलो प्रति हेक्टरी देता येते. ज्या भागात गंधकाचा तुटवडा आहे अशा ठिकाणी २० किलो जिप्सम प्रति हेक्टर किंवा सिंगल सुपर फॉस्फेट वापरणे फायदेशीर ठरते.

रोग आणि कीड व्यवस्थापन :मसूर पिकावर रोग होऊ नये म्हणून पिकाची तण काढणे आणि कोंबडी काढणे अत्यंत आवश्यक आहे. पिकातील तणांच्या उपलब्धतेनुसार पेरणीनंतर २०-२५ दिवसांनी आणि खुरपणी झाल्यानंतर ४०-४५ दिवसांनी खुरपणी, कोंबडी किंवा स्ट्रिंगिंग करावी. तणांच्या रासायनिक नियंत्रणासाठी पेंडी-मिथिलीन किंवा फ्लुक्लोरालिन ०.७५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून ते एक हेक्टरमध्ये विरघळवून जमिनीत मिसळल्यास तणांचा प्रादुर्भाव टाळता येतो. मसूर पिकावर पतंग, ॲफिड आणि थ्रिप्स आणि शेंगा बोअरर सुरवंटाचा प्रादुर्भाव आढळतो. कीड नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस (१.५ मिली) किंवा क्विनालफॉस (१ मिली) प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. याशिवाय मसूर पिकामध्ये उपटणे आणि गेरू येण्याची शक्यता अधिक आहे. यासाठी पेरणीपूर्वी थिरम ३ ग्रॅम किंवा थिरम १.५ ग्रॅम + बेव्हिस्टिन १.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्याची बीजप्रक्रिया करावी. डिथेन एम-४५, २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून उभ्या पिकावर फवारणी केल्यास जिरेनियम रोगाचे नियंत्रण करता येते.

कापणी आणि मळणी :पिकाच्या शेंगा सुकून पिवळ्या पडल्यावर काढणी करावी. जास्त पिकल्यामुळे मसूर शेतातच पडू शकतो. त्यामुळे वेळेत कापणी करा. यानंतर, खळ्यात वाळवा आणि घासून घ्या. यानंतर बिया चांगल्या प्रकारे वाळवून गोण्या किंवा ड्रममध्ये साठवा.

मसूर शेतीतील खर्च आणि कमाई : त्याची एक हेक्टरमध्ये लागवड केल्यास २०-२५ क्विंटल मसूराचे उत्पादन मिळते. मसूर पिकाची योग्य काळजी घेऊन सिंचन व खतांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना यापेक्षा जास्त उत्पादन मिळू शकते.




### जागतिक दिवस
### सामाजिक न्याय दिवस

### महत्वाच्या घटना

१७९२ : जॉर्ज वॉशिंग्टनने टपाल सेवा कायद्यावर सही केल्यामुळे अमेरिकेत टपाल खात्याची सुरूवात झाली.
१८३५ : आजच्या दिवशी कोलकत्ता मेडिकल कॉलेज मध्ये अधिकारारिक रित्या विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु केले.
१८४६ : इंग्रजांनी आजच्या दिवशी लाहोर वर ताबा मिळवला.
१८४७ : घोड्यांच्या शर्यतीची संस्था रॉयल कलकत्ता टर्फ क्लब ची स्थापना करण्यात आली.
१८६८ : बंगाल चे प्रसिद्ध वृतपत्र 'अमृत बाजार पत्रिका' आजच्या दिवशी सुरुवात झाली.
१९३५ : कॅरोलीन मिकल्सेन हि पहिल्यांदा अंटार्क्टिका येथे हि पाउल ठेवणारी पहिली महिला ठरली.
१९४७ : तत्कालीन ब्रिटीश प्रधानमंत्री क्लीमेंट एटली यांनी भारताचे स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली.
१९७८ : शेवटचा 'ऑर्डर ऑफ व्हिक्टरी' सन्मान लिओनिद ब्रेझनेव्ह यांना देण्यात आला.
१९८७ : मिझोराम भारताचे २३ वे राज्य बनले.
२००९ : संयुक्त राष्ट्र संघाने २० फेब्रुवारी ला सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरे करण्यास सुरुवात केली.
२०१४ : बऱ्याच गदारोळानंतर राज्यसभेतही आंध्र प्रदेशच्या विभाजनाचे विधेयक संमत झाल्याने 'तेलंगण' हे भारताचे २९ वे राज्य बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : लुडविग बोल्टझमन - ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ५ सप्टेंबर १९०६)
१९०१ : इजिप्त चे पहिले अध्यक्ष मिसर मुहम्मद नागुईब यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑगस्ट १९८४)
१९०४ : अलेक्सी कोसिजीन - रशियाचे पंतप्रधान (मृत्यू: १८ डिसेंबर १९८०)
१९२१ : हरियाणा चे माजी मुख्यमंत्री राव वीरेंद्र सिंह यांचा जन्म.
१९२५ : जपानी सुमो ४४ वे योकोझुना तोचीनिशिकी कियोटाका यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९९०)
१९३२ : प्रसिद्ध नाटककार के.वी.सुबन्ना यांचा जन्म.
१९३६ : माजी भारतीय फुटबॉल खेळाडू जर्नल सिंह यांचा जन्म.
१९५१ : गॉर्डन ब्राऊन - इंग्लंडचे पंतप्रधान
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेता अन्नू कपूर यांचा जन्म.
१९७३ : भारतीय चित्रपट अभिनेते प्रियांशु चटर्जी यांचा जन्म.
१९८८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री जिया खान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०५ : विष्णुपंत छत्रे - भारतातील सर्कस उद्योगाचे जनक (जन्म:१८४६)
१९१० : ब्युट्रोस घाली - इजिप्तचे पंतप्रधान (जन्म: १८४६)
१९५० : बॅ. शरदचंद्र बोस - स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (जन्म: ६ सप्टेंबर १८८९)
१९७४ : के. नारायण काळे - नाट्यसमीक्षक (जन्म: )
१९९३ : प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स लॅम्बोर्गिनी कारचे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचे निधन.
१९९४ : त्र्यं. कृ. टोपे - घटनातज्ज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू.
१९९७ : श्री. ग. माजगावकर - पत्रकार, 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक इंद्रजित गुप्ता - केन्द्रीय गृहमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: १८ मार्च १९१९)
२०१२ : डॉ. रत्नाकर मंचरकर - संत साहित्याचे गाढे अभ्यासक, साक्षेपी समीक्षक व संशोधक (जन्म: ६ आक्टोबर १९४३).

## मराठवाडा, विदर्भातील सहा कारखान्यांचा हंगाम आटोपला




मराठवाडा व खानदेशातील पाच जिल्ह्यातील हंगामात सहभाग घेतलेल्या २६ कारखान्यांपैकी ६ कारखान्यांचा गाळप हंगाम आटोपला असून, २० कारखान्यांचे ऊस गाळप अजूनही सुरू आहे.

प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाच्या माहितीनुसार, तीन मार्च अखेरपर्यंत ऊस गाळप हंगाम आटोपलेल्या कारखान्यांमध्ये नंदुरबारमधील दोन, जळगावमधील एक, छत्रपती संभाजीनगरमधील दोन व बीडमधील एका कारखान्याचा समावेश आहे. फेब्रुवारी महिन्यातच जवळपास सर्व सहा कारखान्याचे गाळप आटोपले आहे. ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे दिसत आहे. यंदाच्या ऊस गाळप हंगामात खानदेशातील नंदुरबार, जळगाव व मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या पाच जिल्ह्यांतून २६ कारखाने सहभागी झाले. या कारखान्यांनी १ कोटी १४ लाख ४२ हजार ९४० टन उसाचे गाळप केले. १५ सहकारी साखर कारखान्यांनी २४ फेब्रुवारी अखेरपर्यंत सुमारे ४९ लाख ४५ हजार २७५ टन उसाचे गाळप केले. या गाळपातून सरासरी ७.७१ टक्के साखर उताऱ्याने ३८ लाख ४५ हजार ७४२ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन केले. दुसरीकडे १० खासगी साखर कारखान्यांनी ६४ लाख ५७ हजार ६६८ टन उसाचे गाळप करत सरासरी ८.५१ टक्के साखर उताऱ्याने ५४ लाख ९४ हजार ४६५ क्विंटल साखरेचे उत्पादन केल्याची माहिती प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालयाच्यावतीने देण्यात आली.

cmyk




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदत १२ वरून ६ महिने

## परभणीत ५६९ सदस्यांवर टांगती तलवार



जाति प्रमाण-पत्र

परभणी । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने काढलेल्या नव्या अध्यादेशामुळे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील राखीव जागांवर निवडून आलेल्या सदस्यांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. जातीच्या वैधता प्रमाणपत्रासाठी पूर्वी असलेली १२ महिन्यांची मुदत आता सहा महिन्यांवर आणण्यात आली. ही अट पूर्ण न केल्यास संबंधित सदस्यांची निवडणूक भूतलक्षी प्रभावाने रद्द झालेली मानली जाणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील तब्बल ५६९ सदस्यांवर अनिश्चिततेची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अध्यादेश काढून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. या सुधारित तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच इतर मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मात्र अनेकदा जात पडताळणी समित्यांवर अर्जांचा प्रचंड ताण येत असल्याने उमेदवारांना वेळेत वैधता प्रमाणपत्र मिळणे कठीण जाते. ही बाब लक्षात घेऊन शासनाने निवडून आल्यापासून सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा दिली आहे. परंतु या सहा महिन्यांच्या कालावधीतही वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर झाल्यास संबंधित सदस्यांची निवडणूक रद्द झाल्याचे मानण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात याचे मोठे परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी निवडून आलेल्या सदस्यांना वैधता प्रक्रियेचा पाठपुरावा करावा लागणार असून, प्रशासनावरही पडताळणी प्रक्रियेचा ताण वाढणार आहे. राजकीय जाणकारांच्या मते, शासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये शिस्त व पारदर्शकता वाढण्यास मदत होईल; मात्र दुसरीकडे पडताळणी समित्यांची क्षमता आणि प्रक्रिया गतीमान नसल्यास अनेक लोकप्रतिनिधींना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे शासनाने पडताळणी समित्यांचे कामकाज अधिक सक्षम करण्याची गरजही व्यक्त केली जात आहे. आगामी काळात या अध्यादेशाचा स्थानिक राजकारणावर नेमका काय परिणाम होतो, याकडे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील संभाव्य सदस्यांची संख्या लक्षात घेतली असता या निर्णयाचे परिणाम व्यापक असणार असल्याचे दिसते. परभणी तालुक्यात ८८, सेलू येथे ६७, जिंतूर येथे १०१, पाथरी येथे ४२, मानवत येथे ४१, सोनपेठ येथे ४१, गंगाखेड येथे ७१, पालम येथे ५३ आणि पूर्णा येथे ६५ अशा एकूण ५६९ सदस्यांना सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

## सतीश घाटगे यांच्या पुढाकारातून शेत-पानंद रस्त्याच्या क्रांतीची सुरवात!



घनसावंगी। प्रतिनिधी

शेत-पानंद रस्ते ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारपेठेपर्यंत विनाअडथळा पोहोचावा आणि दळणवळणाची सोय व्हावी, या उद्देशातून समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी शेतरस्ते खुले करण्याची मोहीम नव्या गतीने पुन्हा सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत सोमवारी शिंदेवडगाव आणि शेवगळ तांडा येथील शेत-पानंद रस्त्यांच्या कामाला प्रारंभ करण्यात आला.सतीश घाटगे यांच्या संकल्पनेतून घनसावंगी, अंबड व जालना तालुक्यात सन २०२३-२४ या काळात २०५ किमी रस्ते समृद्धी कारखान्याने स्वखर्चातून तयार केले आहेत. विशेष म्हणजे शेतकऱ्यांमधील आपसातील वाद मिटवून हे रस्ते तयार करण्यात आले आहेत. या रस्त्यांमुळे हजारो शेतकऱ्यांची वर्षानुवर्षांची अडचण दूर झाली आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये या कामांचा मोठा फायदा ऊस उत्पादक शेतकरी वर्गाला झाला असून, लाखो मेट्रिक टन ऊस विनाअडथळा कारखान्यापर्यंत पोहोचला आहे. दरम्यान, समृद्धी साखर कारखान्याने रस्ते खुले करण्याची मोहीम पुन्हा सुरू केली असून, सतीश घाटगे यांच्या हस्ते सोमवारी शेवगळ तांडा ते रांजणी रेल्वे स्टेशन रस्ता (३.५ किमी) आणि शिंदेवडगाव ते आवलगाव (२ किमी) या रस्त्यांच्या कामाला सुरुवात झाली. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत-पानंद रस्ते योजनेतून समृद्धी कारखान्याने तयार केलेल्या २०५ किमी रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे हे रस्ते अधिक दर्जेदार होतील. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्यातून घनसावंगी, अंबड आणि जालना तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांच्या शेत-पानंद रस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी माझे प्रयत्न असल्याचे याप्रसंगी सतीश घाटगे यांनी सांगितले.

## थोडक्यात



### शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे

मंठा । प्रतिनिधी

आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून मंठा येथे सुरू असलेल्या शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी केल्याशिवाय कामाचे देयक देण्यात येऊ नयेत अशी मागणी लक्ष्मण बाबासाहेब बोराडे यांनी केले आहे. येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्यांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, नवीन शासकीय विश्रामगृहाच्या इमारतीचे बांधकाम हे अंदाजपत्रकाप्रमाणे न करता अधिकाऱ्यांसोबतच्या अर्थपूर्ण संबंधामुळे संबंधित गुत्तेदार हे बांधकामासाठी रेती व सिमेंट निकृष्ट दर्जाचे वापरत आहेत. शासनाची दिशाभूल करून सुरू असलेल्या नवीन विश्रामगृहाच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करावी, बोगस कामाचे देयक देण्यात येऊ नये. अन्यथा लोकशाही मार्गाने उपोषण करावे लागेल असा इशारा लक्ष्मण बाबासाहेब बोराडे यांनी दिला आहे.

### तीर्थपुरीत २९२ घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा

अंकुश सोनवणे

घनसांवगी : घनसांवगी तालुक्यातील तीर्थपुरी येथील नगरपंचायत शहरांमधील २०२४ ते २०२५ या वर्षातील प्रधानमंत्री आवास योजना ० १ मधील ११३० लाभार्थ्यांनी घरकुल मागणी अर्ज केले होते त्यापैकी काहींच्या कागदपत्र व जागा अभावी तर काहींचा भोगवटाधारक जागा असल्यामुळे अनेकांचे घरकुल नाम मंजूर झाले मात्र त्यापैकी ६१८ लाभार्थ्यांना मंजूर यादीत बांधकाम परवाना मिळाले आहे त्यापैकी २९२ घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरित करण्यात आला तर दुसरा हप्ता १२५ लाभार्थ्यांना तर तिसरा हप्ता ७२ घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाला आहे उर्वरित राहिलेले ३२६ मंजूर लाभार्थ्यान च्या कामाचा पाहाणी अहवाल करुन राहिलेले हे ३२६ मंजूर लाभार्थ्यांच्या खात्यात पुढील ३० दिवसाच्या आत या लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करणार असल्याचे तीर्थपुरी नगरपंचायत चे मुख्य अधिकारी संतोष वाघमारे यांनी सांगितले. काही तांत्रिक अडचणीमुळे राहिलेल्या जि ओ ट्रेकिं फोटो आदी लाभार्थ्यांचे मंजुरी यादीत नाव नसल्याने प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोन मध्ये घेण्यात येईल व कोणी वशिलेबाजीनी कोणी आर्थिक मागणी करीत असतील तर संबंधितावर कायदेशीर कारवाई केली जाईल असे देखील वाघमारे यांनी सांगितले.

### यादीतून नाव कमी; भाजप कार्यकर्त्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

लातूर । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या स्वीकृत सदस्य म्हणून ऐनवेळी नाव वगळण्यात आल्याने संतप्त झालेले भाजपचे कार्यकर्ते संजय गीर यांनी मंगळवारी (दि.१०) स्वतःवर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, उपस्थित कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला याबाबत अधिक माहिती अशी, भाजपच्या कोट्यातून दोन स्वीकृत सदस्यांची निवड होणार होती. भाजपचे गटनेते दीपक मठपती यांनी सुरुवातीला भीमा बेंबळकर आणि संजय गीर यांची नावे निश्चित केली होती. मात्र, ऐनवेळी संजय गीर यांचे नाव यादीतून बाद करून त्यांच्या जागी दुसरे नाव जाहीर करण्यात आले. आपल्यावर अन्याय झाल्याच्या भावनेतून आणि पक्षश्रेष्ठींच्या या निर्णयाचा निषेध म्हणून संजय गीर यांनी संतापाच्या भरात अंगावर डिझेल ओतून घेतले. त्यांनी पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिथे उपस्थित इतर कार्यकर्त्यांनी त्यांच्या हातातील आगपेटी हिसकावून घेतली.

## संत तुकाराम महाराज बीजनिमित्त कीर्तन, पारायण व धार्मिक कार्यक्रम

मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरातील संत श्री तुकाराम महाराज मंदिरामध्ये संत तुकाराम बीज निमित्त सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्याची सांगता संत तुकाराम बीज दिनी पार पडली. यावेळी शहरासह परिसरातील महिला व नागरिकांनी दर्शनासाठी व किर्तन सोहळ्यासाठी मोठी गर्दी केली होती. संत तुकाराम महाराज यांच्या बीजनिमित्त मंठा शहरात विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, हरिपाठ तसेच पारायण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शहरातील वारकरी, भाविक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीमय वातावरणाची अनुभूती घेतली. सकाळपासूनच शहरातील संत तुकाराम महाराज मंदिरात अभंग, हरिनाम संकीर्तन आणि भजनाने भक्तिरसाचा दरवळ निर्माण झाला. वारकरी संप्रदायातील भाविकांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात शहरातून भक्तिमय



दिंडी काढली. या दिंडीत महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

यानंतर आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता दिनी हभप श्रीहरी बाहेकर महाराज यांनी काल्याच्या कीर्तनात संत तुकाराम महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. व त्यांच्या अभंगांमधून समाजाला मिळणारे नैतिक मूल्य, समता आणि भक्तीचा मार्ग यावर प्रभावी विवेचन करण्यात आले. उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात कीर्तनाला दाद दिली. यावेळी तुकाराम महाराज पारायण सोहळाही मोठ्या भक्तिभावाने पार पडला. वारकरी व भाविकांनी अभंग पठण करत हरिनामाचा गजर केला. संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. दिवसभर सुरू असलेल्या कार्यक्रमात महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संतपरंपरेचा संदेश जनमानसात पोहोचविण्यासाठी अशा धार्मिक कार्यक्रमांचे महत्त्व मोठे असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. संतांच्या विचारांचा वारसा जपत समाजात सद्भावना, समता आणि भक्तीभाव वाढावा, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

## रील स्टार अरुण तुपेचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी



शहरातील प्रसिद्ध रील स्टार आणि सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर अरुण तुपे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या अकस्मात निधनामुळे शहरासह सोशल मीडिया विश्वात हळहळ व्यक्त होत आहे.

अरुण तुपे हे सोशल मीडियावर रील्स आणि विविध मनोरंजनात्मक व्हिडिओंमुळे मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले होते. त्यांच्या व्हिडिओंना प्रेक्षकांची चांगली पसंती मिळत होती. शहरात त्यांचा मोठा चाहतावर्ग देखील तयार झाला होता. मात्र त्यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजताच मित्रपरिवार, चाहते आणि सोशल मीडियावर अनेकांनी शोक व्यक्त केला आहे.

## बनावट सोनसाखळी विकून साडेतीन लाखांची फसवणूक

धाराशिव । प्रतिनिधी

कमी किमतीत सोन्याची साखळी देण्याचे आमिष दाखवून एका महिलेची साडेतीन लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना धाराशिव शहरात घडली. या प्रकरणी धाराशिव शहर पोलिस ठाण्यात दोन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्नेहल दत्ता नन्नवरे (वय २२, रा. कुरणे नगर, ता. धाराशिव, मूळ रा. भातंब्रे, ता. बार्शी, जि. सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरातील एका रिटेल-होलसेल दुकानाजवळ दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. कमी किमतीत सोन्याची साखळी विकायची असल्याचे सांगून त्यांनी फिर्यादीला ती खरेदी करण्यास प्रवृत्त केले.

फिर्यादीने साखळी खरेदी केल्यानंतर ती सोन्याची नसून पितळसदृश धातूची असल्याचे लक्षात आले. अशा प्रकारे आरोपींनी ३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी नन्नवरे यांनी ६ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून परभणीत अर्थसंकल्पाची होळी

परभणी । प्रतिनिधी

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थ संकल्पाची होळी सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील उपोषण मैदानावर करण्यात आली.

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करतो म्हणणारे आज अधिवेशनात अर्थसंकल्प सादर करताना फक्त २ लाखांपर्यंतचेच कर्ज सरकार माफ करणार. आणि त्यासाठीही पात्र व अपात्र ठरविण्यात येणार असल्याचे सांगत आहेत. सुरळीत कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त ५० हजार देणार अशी तूट पूंजी मदत शेतकऱ्यांना होणार असून हा अर्थसंकल्प शेतकरी हिताचा नसून शेतकऱ्यांना मारक असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने म्हटले आहे. मराठवाड्यात रोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असून या वाढणाऱ्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी अर्थसंकल्पात काहीच तरतूद न केल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने म्हटले. भाजप सरकारने १५ वर्षापासून सातत्याने शेतमालाचे भाव पाडण्याचेच काम केले. त्यात सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, मका यांसारख्या पिकांचा समावेश आहे. केंद्र सरकार पिकांचा हमीभाव जाहीर करते, तोही पिकांचा उत्पादन खर्च भरून काढत नाही.

केंद्र सरकारने जाहीर केलेला हमीभाव मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कधीच मिळत नाही. हमीभावापेक्षा एक ते दीड हजारांनी शेतमाल विकावा लागतो. त्यामुळे मराठवाड्यात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या होत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी देवेंद्र फडणवीसांनी शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. संपूर्ण सातबारा कोरा करू म्हणणारे आज फक्त पात्र शेतकऱ्यांना २ लाखांची कर्जमुक्ती देतो म्हणत आहेत. आजतागायत शेतकऱ्यांना कर्जमुक्तीसाठी झुलवत ठेवले आणि जेव्हा कर्जमुक्ती द्यायची वेळ आली, त्यातही सरकार अटीशर्ती घालत पात्र, अपात्र ठरवत आहे. सरकारची चालाकी असून शेतकऱ्यांची क्रूर थट्टा चालविल्याचा आरोप स्वाभिमानी संघटनेने केला. याचा निषेध म्हणून मुख्यमंत्री फडणवीस यांनी २०२६ चा जाहीर केलेल्या अर्थसंकल्पाची स्वाभिमानीकडून होळी करण्यात आली. यावेळी स्वाभिमानीचे मराठवाडा अध्यक्ष किशोर ढगे, पी.टी.निर्वळ, कलीमभाई कोक्कर, मुंजाभाऊ लोडे, आदिनाथ लवंदे, हनुमान आमले, किशन शिंदे, विठ्ठल चोखट, गजानन ढगे, लक्ष्मण चव्हाण आदी उपस्थित होते.

# दलित वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणीसाठी कलेक्टरांच्या देखरेखीत यंत्रणा उभारा-खंडपीठ

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या दलित वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणीत झालेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली यंत्रणा उभारण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी व न्या. हितेन वेणेगावकर यांनी दिले आहेत.

लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते महेश व्यंकटराव अलगुडे व इतरांच्या वतीने ॲड. देवदत्त पालोदकर यांच्यामार्फत दाखल जनहित याचिकेवरील सुनावणीवेळी वरील निर्देश देण्यात आले आहेत. याचिकेनुसार अनुसूचित जातींच्या वस्त्यांमध्ये मूलभूत



नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने अनुसूचित जाती-नवबौद्ध वस्ती विकास योजना अर्थात दलित वस्ती सुधार योजना सुरू केली आहे. महाराष्ट्रात सुमारे ३७ हजार ५५८ दलित वस्त्या असून, या वस्त्यांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज, गटारी व सामुदायिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दरवर्षी राज्य शासन कोट्यवधी रुपयांचा निधी जिल्हा परिषदांमार्फत उपलब्ध करून देते. निधीचे वितरण समतोल पद्धतीने व्हावे आणि सर्व वस्त्यांना त्याचा लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारने ५ डिसेंबर २०११ रोजी शासन निर्णय जारी करून सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली होती. त्यानुसार जिल्हा परिषद हे निधी वितरणाचे एकक मानून प्रत्येक तालुक्यातील अनुसूचित जातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वाटप करणे, कामे निश्चित प्राधान्यक्रमानुसार मंजूर करणे आणि विविध वस्त्यांमध्ये आलटून-पालटून कामे देणे अशी तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत या नियमांचे पालन होत नसल्याचा मुद्दा याचिकेत उपस्थित करण्यात आला. या प्रकरणात राज्य सरकार, विभागीय आयुक्त, समाजकल्याण अधिकारी तसेच लातूर जिल्हा परिषद यांना प्रतिवादी करण्यात आले होते. प्राथमिक सुनावणीनंतर खंडपीठाने प्रतिवादींना शपथपत्र सादर करण्याचे निर्देश दिले होते. खंडपीठाने शासन निर्णयांची अंमलबजावणी करणे ही प्रशासनाची जवाबदारी असून, त्यासाठी स्वतंत्र आदेश देण्याची आवश्यकता नसल्याचेही स्पष्ट केले. मात्र मंजूर केलेला निधी प्रत्यक्षात योग्य पद्धतीने वितरित होत आहे का, याची पडताळणी करण्यासाठी यंत्रणा नसल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले. मंजूर निधीपेक्षा अधिक रक्कम वितरित होणार नाही, याची खात्री करण्याचे आणि निधीचे वितरण नियमानुसार होत आहे का यावर सतत नियंत्रण ठेवण्याचे निर्देश खंडपीठाने दिले. या प्रकरणात ॲड. देवदत्त पालोदकर, शासनातर्फे ॲड. अभिजीत फुले, तर लातूर जि. प. कडून ॲड. उत्तम बोंदर यांनी काम पाहिले.

# पोलिस-महसूल कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गोदाकाठावर अवैध वाळू उपसा

## जिल्हाधिकारी बीड यांच्यासह एसपी नवनीत काँवत यांची भूमिका संशयास्पद -अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

गेवराई व माजलगाव तालुक्यातील गोदाकाठ परिसरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीमागे पोलिस व महसूल प्रशासनातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांचे संगनमत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड पश्चिमचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी बीड आणि पोलीस अधीक्षक बीड यांना सविस्तर तक्रार दिली आहे.

तक्रारीनुसार, गेवराई तालुक्यातील गंगावाडी, बोरगाव, गोपत पिंपळगाव, श्रीपत अंतरवाला, तपे निमगाव (गोदाकाठ परिसर) तसेच माजलगाव तालुक्यातील रिधोरी, शेलगाव, काळेगाव या भागांमध्ये रात्री-दिवस मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरू आहे. स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणात पोलिस व महसूल विभागातील काही अधिकारी-कर्मचारी आर्थिक फायद्यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा सुरू आहे.



या संदर्भात गेवराई व माजलगाव उपविभागातील काही पोलीस कर्मचारी, अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील काही कर्मचाऱ्यांची नावेही वारंवार पुढे येत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या संगनमतामुळे गोदाकाठ परिसरात मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा आणि वाहतूक सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तपे निमगाव, रिधोरी, शेलगाव, काळेगाव आणि श्रीपत अंतरवाला परिसरात काही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचा साठा करून ठेवला असल्याचा उल्लेखही करण्यात आला आहे.

अवैध वाळू वाहतुकीमुळे परिसरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात जड वाहने धावत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात महसुली नुकसान होत असून पर्यावरणीय संतुलन बिघडण्याचा धोका वाढत असल्याचीही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणाची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मोबाईल सीडीआर (उरश्रश्र ऊशींरळश्र ठशलीव) व तांत्रिक माहिती तपासावी, तसेच संगनमत आढळल्यास तात्काळ निलंबन पान ३ वर

# आजच्या तरूणांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत - परमेश्वर सातपुते

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर सर्कलमधील मौजे चव्हाणवाडी येथे युवानेते विद्यानाथजी तोडेकर यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त शिवचरित्रकार राहुल गिरी यांच्या प्रेरणादायी शिवव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आजच्या तरूणांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत हीच खरी शिवजयंती ठरेल चव्हाणवाडी येथे आयोजित शिवजयंती कार्यक्रमाप्रसंगी बोलताना शिवसेनेचे मा.जिल्हाप्रमुख परमेश्वर




सातपुते यांनी व्यक्त केले मनोगत..

या कार्यक्रमाला परिसरातील शिवप्रेमी व ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमास शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्यासह भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुंदर भाऊ चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव यशवंत भाऊ कदम, गावचे सरपंच ज्ञानेश्वर माऊली शिंदे, तुळशीदास भाऊ पवार, मुकादम नामदेवजी तोडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती,यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शिवचरित्रकार राहुलजी गिरी यांनी आपल्या ओजस्वी व प्रेरणादायी भाषणातून छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, स्वराज्याची स्थापना, त्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व तसेच समाजासाठी दिलेले आदर्श यांचे सविस्तर वर्णन केले. त्यांच्या व्याख्यानामुळे उपस्थितांमध्ये स्वराज्य, पान ३ वर

# माणुसकीचा इतिहास निर्माण करणारा बोडखे-विधाते विवाह सोहळा!

## डॉ.शिवानी आणि डॉ.सत्यजित शुभमंगल; भावी आयुष्याची गोड सुरुवात

आष्टी । प्रतिनिधी

लग्न म्हणजे दोन जीव,दोन कुटुंब आणि संस्कृतीचा पवित्र मिलाफ असतो; किंबहुना लाजा होम, कन्यादान आणि सप्तपदी हे मुख्य संस्कार असतात. लग्नातील मंगलमय वातावरण.. भावी जीवनासाठी असंख्य विविध क्षेत्रातील दिग्गजांनी आणि अत्यंत सामान्यातल्या सामान्य कुटुंबातील ज्येष्ठांनी सायंकाळच्या वातावरणात खास मुद्दामहून उपस्थिती लावत वधू-वरांना दिलेल्या भावी जीवनाच्या शुभेच्छा.. एकूणच मंगल कार्याच्या समोरील मोठ्या परिसरात गाड्यांना ही जागा पुरणार नाही एवढी भव्य दिव्य उपस्थिती लावत आलेल्या आशीर्वादासाठीच्या





वराडींनी यंदाच्या विवाह क्षेत्रातील उपस्थितीचा उच्चांक साधला!

प्रसंग आहे बोडखे आणि विधाते परिवाराच्या शुभमंगल सोहळ्याचा!

तब्बल २६ वर्षापासून आपल्या समतोल लेखणीच्या माध्यमातून आणि प्रचंड कष्ट मेहनत आणि त्या संयम ठेवून चालवलेल्या दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तमराव बोडखे आणि शिक्षण क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण नावामध्ये कार्यरत राहून आनंदराव धोंडे महाविद्यालयाला राज्यात मानाचे स्थान प्राप्त करून देणाऱ्या प्राचार्य तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या आजपर्यंतच्या कर्तुत्वाचा हा परिपाक ठरला.त्या भागातील सर्वसामान्यांच्या विवाह सोहळ्यातील गर्दीचा अत्यंत आनंदाने जाणीवपूर्वक उपस्थिती लावून वधूवरांना शुभेच्छा देण्याच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचा हा लक्षणीय पान ३ वर

# महिलादिनी मुलींनी सांभाळला थेटेगव्हाण आश्रम शाळेचा कारभार

वडवणी । प्रतिनिधी

८ मार्च जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करण्यात आला.काही क्षेत्रांपुरतीच मर्यादित असणारी स्त्री..!आज प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने गल्लीपासून..! ते दिल्लीपर्यंत..! धरणी मातेची ओटी भरण्यापासून...! ते भारत भूमीचे सीमेवर रक्षण करण्यापर्यंतचे...! सर्व कामामध्ये महिला आपल्या कार्याचा ठसा...! उमटवत आहेत. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शासकीय माध्यमिक आश्रम शाळा थेटेगव्हाण कॅम्प (कांदेवाडी)ता.धारूर जि. बीड या शाळेमध्ये एक आगळा-



वेगळा सृजनशील नवोपक्रम राबवण्यात आला.आठ मार्च या दिवसभरातील शालेय प्रशासनाचा सर्व कारभार शाळेतील मुलींनीच व्यवस्थित रित्या पार पडला.यामध्ये मुख्याध्यापिका म्हणून रेखा अंभुरे,शिक्षिका श्यामबाला वाकतकर,रुक्मिणा जटाळे,आरती माळी,जयश्री ठाकरे,अधीक्षिका रुक्मिणा तनपुरे,नर्स/परिचारिका वैष्णवी चाफे,शिपाई वर्षा माळी या विद्यार्थिनींनी पान ३ वर

# बदामराव पंडित यांच्याकडून १४ मार्चला इफ्तार पार्टीचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी



मुस्लिम बांधवांच्या रमजान या पवित्र उपवासाच्या महिन्यानिमित्त लोकनेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने दिनांक १४ मार्च २०२६ रोजी गेवराई येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बदामराव पंडित यांनी केले आहे.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने दरवर्षी मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिना निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते. यावर्षी दिनांक १४ मार्च २०२६ रोजी नगर परिषद शॉपिंग सेंटर येथे सायंकाळी या इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवा नेते रोहित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांनी केले आहे.

# सातबारा कोरा करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री यांनी पाळले नाही -आमटे

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकी दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांचा ''सातबारा कोरा करू'' असे आश्वासन दिले होते. मात्र निवडून आल्यानंतर कर्जमाफीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्यात आले असल्याची टीका शेतकरी हक्क मोर्चाचे कार्यकर्ते राजेंद्र आमटे यांनी केली आहे.

शेतकरी नेते बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे मोठे शेतकरी आंदोलन झाले होते. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र ते आश्वासन प्रत्यक्षात पूर्ण झाले



नाही, ही बाब दुर्दैवी असल्याचे आमटे यांनी म्हटले आहे. नागपूर येथील आंदोलनानंतर अनेक बँकांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यासाठी ''कर्ज नवे-जुने'' करण्याची मोहीम राबवली. नवे-जुने केले तरी कर्जमाफीचा लाभ मिळेल असे खोटे आश्वासन देऊन अनेक शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात येणारे ५० हजार रुपयांचे अनुदान अपुरे असल्याचे सांगत पान ३ वर



**माजलगाव : जगद्गुरू तुकोबारायांच्या रथापुढील दिंडीचे पहिले मानकरी ह.भ.प.भगवान बाबा पात्रूडकर (मातारबाबा) यांनी पवित्र नर्मदा परिक्रमा (३६०० कि.मी.) यशस्वीरीत्या पूर्ण करून आल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. या महान आध्यात्मिक कार्याबद्दल भाई गंगाभीषण थावरे यांनी अंत:करणपूर्वक सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.**

# स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात लसीकरण मोहिमेची सुरुवात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**आज दिनांक ९ मार्च २०२६ रोजी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे एचपीव्ही () लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय स्तरावर शुभारंभ करण्यात आला होता.**

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच आरोग्य राज्यमंत्री




मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला.

त्या अनुषंगाने दि. ९ मार्च २०२६ पासून अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागातील ओपीडी क्रमांक २० येथे या लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शंकर धपाटे यांनी सांगितले की, एचपीव्ही लस ही प्रामुख्याने गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी दिली जाते. वय वर्षे १४ पेक्षा जास्त व १५ वर्षांखालील मुलींनी या लसीचा लाभ घ्यावा. ही लसीकरण मोहीम पुढील तीन महिने सुरू राहणार असून पालकांनी आपल्या मुलींना लसीकरणासाठी आणावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. राकेश जाधव, जनऔषध वैद्यकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर.सी. संबुटवाड, डॉ. विनोद वेदपाठक, सहयोगी प्राध्यापक डॉ. दिपाली देव, सहाय्यक प्राध्यापक डॉ. योगेश माने, डॉ. योगेश गालफाडे, डॉ. प्रमोद तोटावाड, वरिष्ठ निवासी डॉ. शेरॉन मुरमो, पदव्युत्तर विद्यार्थी सारिका पुरणवाड, इनचार्ज सिस्टर तसेच समाजसेवा अधीक्षक श्री. आशोक वाघोळे, आरोग्य शिक्षक श्री. संजय जाधव, परिचारिका, आंतरवासिता विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती होती.

ओपीडी क्रमांक २० येथे एचपीव्ही लस दररोज सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत उपलब्ध असून १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केले आहे.

# कलेमुळे समाज एकत्र येऊन राष्ट्र संघटीत होते -डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाकवी कालिदास सभागृहात आज इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नाशिक शाखेच्या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.**

कार्यक्रमाच्या सुरूवातीला प्रमुख डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी आपल्या भाषणात सांस्कृतिक वारशाचे महत्त्व अधोरेखित करत डॉक्टरांच्या तरूण पिढीने आणि समाजातील प्रत्येक घटकाने त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. पुढे बोलताना डॉ.इंगोले यांनी कला ही केवळ मनोरंजनासाठी नसून ती आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. कला माणसाला मानसिक शांतता देते, आधार देते त्याच्या कल्पनाशक्तीला चालना देते आणि जीवनातील सौंदर्य जाणून घेण्याची दृष्टी देते. नृत्य, संगीत, चित्रकला,



साहित्य यांसारख्या कला मानवाला स्वतःचा शोध घेण्याची संधी देतात. अशा कार्यक्रमांमुळे आपण आपल्या संस्कृतीच्या मुळांशी जोडले जातो आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याची प्रेरणा मिळते असे सांगत प्रत्येकाने आपल्या धकाधकीच्या जीवनात आपले सुप्तगून आणी कला जोपासली पाहिजे आणी त्याची साधना केली पाहिजे असे मत व्यक्त केले. डॉ.इंगोले यांनी अशा प्रकारचे कार्यक्रम यापुढेही होत राहावेत, अशा शुभेच्छा देत कला ही फक्त व्यक्तीपुरती मर्यादित नसते, तर ती समाजाला आणी राष्ट्राला एकत्र बांधण्याचे काम करते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या जीवनात कलेला स्थान दिले पाहिजे. असे मत व्यक्त केले. झालेल्या यां बहारदार कला उत्सव कार्यक्रमात विविध डॉक्टर्स कलाकारांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक नृत्य, गायन, वाद्यसंगीत आणि नाट्य यांचा समावेश असलेल्या सादरीकरणांनी कार्यक्रमात रंगत आणली. विशेषतः स्थानिक डॉक्टर्सनी सादर केलेल्या नृत्य कलाकृतींनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक शाखेचे सांस्कृतिक सचिव डॉ.मिलिंद भराडिया, डॉ.आदिती वानखेडे, डॉ.परीक्षित महाजन, डॉ.पंकज चव्हाण, डॉ.अनुप भारती डॉ मंजुषा, डॉ.राजेंद्र कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या निमित्ताने शहरातील डॉक्टर्स कलाकारांना आपली कला सादर करण्याची उत्तम संधी मिळाली. विविध कला, संगीत, नृत्य आणि स्थानिक कला परंपरांचे दर्शन घडवणारा हा कार्यक्रम रसिकांच्या मनाचा ठाव घेणारा ठरला असे मत उपस्थित कला प्रेमींनी व्यक्त केले. कार्यक्रमाला शहरातील सर्व डॉक्टर्स, प्रतिष्टीत नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने कलाप्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंसचालन डॉ.मंगेश थिटे व डॉ आदिती वानखेडे यांनी केले. तर कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कलाकार आणि उपस्थितांचे आभार डॉ.मिलिंद भराडिया यांनी मानले.

# संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये जागतिक महिला दिनानिमित्त माता पालक मेळावा घेण्यात आला. या निमित्त शाळेत माता पालकांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या यासाठी यासाठी माता पालक हजर होत्या.

जागतिक महिला दिनानिमित्त सर्वप्रथम विविध कर्तृत्व वान महिलांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या मुख्याध्यापक मीनाक्षी माळकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले तसेच शाळेतील शिक्षक व काही माता पालकांनीही मार्गदर्शन केले. त्या नंतर महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये सर्वप्रथम संगीत खुर्ची या स्पर्धेत प्रथम क्रमांक गीतांजली वैद्य,द्वितीय क्रमांकअनुराधा जोगदंड व तृतीय क्रमांक रोहिणी नाईक यांनी मिळवला. तळ्यात मळ्यात या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकसिमा जाधव,द्वितीय क्रमांकप्रतीक्षा जाधव,तृतीय क्रमांकशितल कोकणे यांनी मिळवला. हात न लावता बिस्कीट खाणे यामध्ये प्रथम क्रमांकसखुबाई गोरे, द्वितीय क्रमांक विद्या गायकवाड,तृतीय क्रमांक मिनाक्षी चौधरी यांनी मिळवला. दोरी उड्या या स्पर्धेत प्रथम क्रमांकसिमा चौरे, द्वितीय क्रमांक पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे जिल्ह्यात २८ महाविद्यालयांत 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

महाविद्यालयांमध्येच आवश्यक दाखले मिळावेत, यासाठी 'आपले सरकार केंद्र' सुरू करण्यासाठी येत असलेल्या अडचणी आता दूर केल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आणखी १८ महाविद्यालयामंध्ये हे केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यापूर्वी १० महाविद्यालयांत केंद्र सुरू करण्याची मान्यता मिळाली होती. ही संख्या आता २८ वर पोचली असून, यात आणखी वाढ होईल, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. हे केंद्र सुरू झाल्याने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांची सोय होणार आहे. दहावी आणि बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विविध प्रकारचे दाखले लागतात. दरवर्षी या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर आपले सेवा केंद्रात हे दाखले मिळविण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांची गर्दी होते. गर्दी झाल्यामुळे त्याचा ताण यंत्रणेवर येतो. अनेकदा हे दाखले वेळेत न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडचणी निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महाविद्यालयांमध्ये आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

'आपले सरकार' केंद्रात विविध प्रकारचे सुमारे ६९ दाखले उपलब्ध होणार आहेत. एका दाखल्यासाठी जाणाऱ्या एकूण शुल्कापैकी ३२.५० रुपये इतकी रक्कम महाविद्यालयास मिळणार आहे. केंद्र चालविण्यासाठी आवश्यक संगणक, प्रिंटर, कागदाच्या सुविधांची रक्कम महाविद्यालयास दिली जाईल. उर्वरित रक्कम ही मिळेल. सरकारला महाविद्यालयांमध्ये विविध पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने केंद्रासाठी स्वतंत्र सुविधा उभी करावी लागणार नाही.

महाविद्यालयांसाठी लागणाऱ्या विविध प्रकारचे दाखले आता जिल्ह्यातील ४०० महाविद्यालयांत उपलब्ध करून देण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात सुमारे १०० महाविद्यालयांत 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यात येणार आहे. आतापर्यंत ७० महाविद्यालयांनी हे केंद्र सुरू करण्यासाठी तयारी दर्शविली आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. त्यानुसार हे सर्व अर्ज मान्यतेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविले होते. त्यानुसार १० अर्जांना मान्यता मिळाली असून, अन्य ६० अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी काढली होती. केंद्र सुरू करण्यासाठी महाविद्यालयांना 'लॉगइन आयडी' देण्यासाठी महाआयटीने पॅनकार्डची मागणी केली होती. अनेक महाविद्यालयांचे आर्थिक व्यवहार त्यांच्या मूळ संस्थांकडून चालविले जात असल्याने महाविद्यालयांनी 'पॅनकार्ड' नव्हते. त्यामुळे महाविद्यालयांना केंद्र सुरू करता येत नव्हते. 'पॅनकार्ड'ची असलेली अट शिथिल करण्याची विनंती जिल्हा प्रशासनाने 'महाआयटी'ला केली होती. त्यानुसार आता ही अट शिथिल केली आहे. त्यामुळे आणखी १८ महाविद्यालयांना हे केंद्र सुरू करण्याची मान्यता दिली असून, आता एकूण संख्या २८ इतकी झाली आहे.

# इंधनटंचाईच्या अफवांमुळे जुन्नरमध्ये गॅस सिलिंडरसाठी नागरिकांची धावपळ

**बेल्हे । प्रतिनिधी**



आखाती देशांमधील युद्धस्थितीचा परिणाम ग्रामीण भागातील जीवनमानावर होऊ लागल्याच्या चर्चेमुळे इंधनटंचाईबाबत अफवा पसरत आहेत. या पार्श्वभूमीवर गॅस सिलिंडरचा पुरवठा खंडित होईल, या भीतीने नागरिक मोठ्या प्रमाणात गॅस घेण्यासाठी गर्दी करीत असल्याचे दिसून येत आहे.

जुन्नर तालुक्यात गॅस सिलिंडरसाठी नागरिकांची धावपळ सुरू असल्याचे चित्र मंगळवारी (दि. १०) पाहायला मिळाले. तालुक्याच्या पूर्व भागातील बेल्हे, राजुरी, निमगाव सावा, मंगरूळ, पारगाव, साकोरी, आणे, नळावणे, शिंदेवाडी आणि बोरी बुद्रुक या गावांमध्ये गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे गॅस वितरणव्यवस्थेवर ताण येत असून, सिलिंडर मिळविण्यासाठी नागरिकांना तासन् तास प्रतीक्षा करावी लागत आहे. या परिस्थितीमुळे वितरणव्यवस्थेवर ताण येण्याची शक्यता असून, गॅस सिलिंडरची साठेबाजी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, इंधनटंचाईची शक्यता व्यक्त केली जात असल्याने आळेफाटा, बेल्हे परिसरातील पेट्रोल पंपांवरही वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होताना दिसत आहे. जुन्नर तालुक्यात गॅसपुरवठ्यात कोणतीही कमतरता नाही. तालुक्यात यासंदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. पूर्वी २१ दिवसांनी गॅस बुकिंग करता येत होते. मात्र, शासनाने आता २५ दिवसांनी बुकिंगची सुविधा दिली आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच गॅस सिलिंडरची साठेबाजी करू नये. गॅस तसेच इंधनपुरवठा सुरळीत सुरू राहील, असे पुरवठा निरीक्षक अधिकारी ज्ञानेश कुलकर्णी यांनी सांगितले.

# वाहनचालकांविरुद्ध कारवाई आणि अपघात रोखण्यासाठी लोणावळा-वडगाव महामार्गावर लेझर स्पीड कॅमेरे

**पुणे । प्रतिनिधी**

वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांना चाप लावण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांकडून जुन्या मुंबई- पुणे राष्ट्रीय महामार्गावर वडगाव मावळ, लोणावळा येथे अत्याधुनिक लेझर स्पीड कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांमुळे भरधाव वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. सहा महिन्यांच्या प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

'महामार्गावर होणारे बहुतांश अपघात वेग आणि वाहनचालकांच्या चुकांमुळे घडतात. बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई, तसेच अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून लेझर स्पीड कॅमेऱ्यांचा वापर सुरू केला आहे. जुन्या मुंबई- पुणे महामार्गावर लोणावळा, वडगाव मावळ परिसरात हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ब्लूमबर्ग फिलान्थॉपीज इनिशिएटिव्ह फॉर ग्लोबल रोड सेफ्टी आणि ग्लोबल रोड सेफ्टी पार्टनरशिप या संस्थांकडून सहकार्य करण्यात आले आहे', अशी माहिती पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी दिली.



लोणावळा, वडगाव मावळ परिसरात तीन ठिकाणी कॅमेरे बसविण्यात आले आहेत. हे कॅमेरे दिवसा आणि रात्रीही कार्यान्वित राहतात. कॅमेऱ्यांकडून वाहनांचा अचूक वेग नोंदविला जातो. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांचा ३२० किलोमीटर प्रतितासापर्यंतचा वेग नोंदविण्याची क्षमता या उपकरणांमध्ये आहे, असे गिल्ल यांनी सांगितले. जिल्ह्यातील ५७ टक्के अपघात ग्रामीण क्षेत्रात २०२२ आणि २०२३ या कालावधीत जिल्ह्यातील एकूण प्राणघातक अपघातांपैकी ५७ टक्के अपघात हे पुणे ग्रामीण क्षेत्रात झाले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने दुचाकीस्वार आणि पादचारी व्यक्तींचा समावेश आहे. अहवालानुसार २०२३ मध्ये पुणे ग्रामीण पोलिसांच्या कार्यक्षेत्रात ९८३ जणांचे रस्ते अपघातामध्ये मृत्यू झाले आहेत. हे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत पाच टक्क्यांनी वाढले आहे.

# डॉक्टर विजय लाड यांचा संत सेवक पुरस्काराने गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

श्री समर्थ सेवा ट्रस्ट भडगाव जिल्हा कोल्हापूर यांच्या वतीने पू. निलकंठ महाराज रामदासी यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा संत सेवक पुरस्कार २०२६ नाथषष्ठी च्या पर्वावर दि. ९ मार्च रोजी डॉ . विजय लाड यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आणि मानपत्र श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्य संस्थान संकेश्वर पिठ , करवीर पिठाधीश्वर प.प.श्री सच्चिदानंद अभिनव विद्याभारती आणि प.प. शंकर भारती यांच्या शुभहस्ते तसेच भडगाव मठाचे अधिपती पू. किसन महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत समर्थ वाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. विजय लाड यांना देऊन गौरव करण्यात आला.



पुरस्काराला उत्तर देताना स.भ. विजय लाड यांनी भडगाव मठाची ७२ वर्षाची साधना आणि ७० पेक्षा जास्त गावांमध्ये समाजातील सर्व स्तरात लोकसंग्रह करीत त्यांच्या ऐहिक व पारलौकिक उत्थानासाठी पूजनीय किसन महाराज यांनी केलेल्या कार्याची समर्थ रामदास स्वामींनी दासबोधामध्ये सांगितलेला लोकसंग्रह याचा दाखला देऊन या कार्याची प्रशंसा केली . भडगाव मठाचे कार्य हे देशाला आदर्शवत असून समर्थ रामदास स्वामींनी सांगितलेला राष्ट्रधर्म जागवणारे आदर्श उदाहरण आहे असे मत व्यक्त केले. या पुरस्कार सोहळ्यासाठी आदरणीय शरद बुवा जठार ,अक्षय रेडेकर , विजय जाधव, सौ. शुभदा थिटे, सौ. अपर्णा वांगीकर,सौ. मेधा कुलकर्णी, बाळासाहेब पाटील, भोजन व्यवस्था नरेंद्र गुरुजी, महेश जोशी, सौ. केतकी , गिरीश मांगले तसेच मठातील युवा आणि युवतींनी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुरेख संचालन सौ. वृषाली कुलकर्णी यांनी केले. कल्याण करी रामराया प्रार्थनेने सोहळ्याची सांगता झाली.

# भीषण अपघातात ग्रामसेवकाचा मृत्यू

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील जळगाव क. प. गावाच्या हद्दीतून जाणाऱ्या राज्य मार्गावर सोमवारी रात्री भीषण अपघात घडला. रात्री सुमारे ९ वाजताच्या सुमारास अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एका ग्रामसेवकाचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून संतप्त ग्रामस्थांनी काही काळ रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.



या अपघातात मधुकर धोंडीबा जगताप (रा. भिलारवाडी) यांचा मृत्यू झाला. ते मेडद ग्रामपंचायतीत ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते. सोमवारी रात्री काम आटोपून ते आपल्या घरी परतत असताना जळगाव क.प. जवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मधुकर जगताप यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. या राज्य मार्गावर अद्याप गतिरोधक बसवण्यात आलेले नसल्यामुळेच येथे वारंवार अपघात होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. याच पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी जळगाव क.प. येथे रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच माळेगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे आणि त्यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणली. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लवकरच या ठिकाणी गतिरोधक उभारण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतले. अपघात घडवून पसार झालेल्या वाहनाचा क्रमांक पोलिसांच्या हाती लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित चालकाविरोधात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. कर्तव्यदक्ष म्हणून ओळख असलेल्या मधुकर जगताप यांच्या आकस्मिक निधनामुळे भिलारवाडी आणि मेडद परिसरात शोककळा पसरली असून त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# पुणे जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी चुरस; राष्ट्रवादीच्या ५१ जागांनंतर राजकीय हालचाली

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने मोठे यश मिळवत ७३ पैकी तब्बल ५१ जागांवर विजय मिळविला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही गटांनी एकत्र येत निवडणूक लढविल्याने सत्तेचा मार्ग सुकर झाला आहे. मात्र, आता जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी जोरदार चुरस निर्माण झाली असून, कोणाला संधी मिळणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



अध्यक्षपदासाठी तीन माजी आमदारांच्या वारसांमध्ये प्रमुख स्पर्धा पाहायला मिळत आहे. दौंडचे माजी आमदार रमेश थोरात यांचे चिरंजीव तुषार थोरात, इंदापूरचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची कन्या अंकिता पाटील-ठाकरे आणि भोरचे माजी आमदार काशिनाथ खुटवड यांचे चिरंजीव विक्रम खुटवड हे तिघेही जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले आहेत. यामध्ये अंकिता पाटील-ठाकरे या सलग दुसऱ्यांदा विजयी झाल्या असून, तुषार थोरात आणि विक्रम खुटवड हे पहिल्यांदाच जिल्हा परिषदेत पोहोचले आहेत.

दौंड तालुक्यातील केडगाव-बोरीपारधी गटातून तुषार थोरात यांनी भाजप उमेदवाराचा पराभव करत विजय मिळविला. दौंडमध्ये माजी आमदार रमेश थोरात आणि भाजपचे आमदार राहुल कुल यांच्यात पारंपरिक राजकीय संघर्ष पाहायला मिळतो. कुल यांनी प्रयत्न करूनही थोरात गटाचा पराभव करण्यात अपयश आले.इंदापूर तालुक्यातील बावडा गटातून अंकिता पाटील-ठाकरे यांनी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवून आपले राजकीय बळ सिद्ध केले आहे, तर भोर तालुक्यातील कामथडी-भोंगवली गटातून विक्रम खुटवड विजयी झाले असून त्यांची पत्नी तृप्ती खुटवड या पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. खुटवड कुटुंबाचा स्थानिक राजकारणात मोठा प्रभाव मानला जातो. दरम्यान, अध्यक्षपदासाठी आणखी काही नावे चर्चेत आहेत. आंबेगावचे आमदार दिलीप वळसे पाटील यांचे पुतणे विवेक वळसे पाटील तसेच दौंड तालुक्यातील ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे यांनाही संभाव्य दावेदार मानले जात आहे. अंतिम निर्णय राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार घेणार असून त्या कोणाला अध्यक्षपदाची संधी देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोराच्या हाती १७ व्या वर्षी पोर्शे कारचं स्टिअरिंग देणाऱ्या विशाल अग्रवालांना जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर येथील चर्चित पोर्शे कार अपघात प्रकरणात महत्त्वाची घडामोड घडली असून या प्रकरणातील आरोपी आणि बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना सुप्रीम कोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. अपघातावेळी कार चालवणाऱ्या अल्पवयीन मुलाचे वडील असलेले अग्रवाल गेल्या दोन वर्षांपासून येरवडा केंद्रीय कारागृह येथे न्यायालयीन कोठडीत होते. अखेर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. अल्पवयीन आरोपीच्या वडिलांच्या आधी रक्ताचे नमुने बदलणाऱ्या डॉक्टरलासुद्धा जामीन देण्यात आला होता. 'हिट अँड रन' प्रकरणातील अल्पवयीन आरोपीचे रक्ताचे नमुने बदलण्याचा आरोप ससून रुग्णालयातील तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अजय तावरे याच्यावर होते. सर्वोच्च न्यायालयाने डॉक्टर तावरेला जामीन यापूर्वी मंजूर केला होता.



गेल्या २२ महिन्यांपासून विशाल अग्रवाल तुरुंगात आहे. कल्याणीनगरमध्ये १९ मे २०२४ रोजी रात्री भरधाव पोर्शे कारने दुचाकीला उडवलं होतं. यात तरुण-तरुणीचा जागीच मृत्यू झाला होता. पोर्शे कार अपघातानंतर आरोपी अल्पवयीन तरुणाच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आले होते. रक्ताचे नमुने बदलल्याच्या प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांना २१ मे रोजी पुणे पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली होती. पुण्यातील कल्याणीनगर परिसरात झालेल्या या भीषण अपघाताने देशभरात मोठी खळबळ उडाली होती. अल्पवयीन मुलाने चालवलेल्या पोर्शे कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पुण्यात तसेच राज्यभर संतापाची लाट उसळली होती. अपघातानंतर पोलिसांनी व्यापक तपास सुरू करत अनेकांना ताब्यात घेतले होते. या प्रकरणात अल्पवयीन चालकाला मद्यप्राशनासाठी मदत केल्याचा तसेच पुरावे लपवण्याचा आरोप करत पोलिसांनी त्याचे वडील विशाल अग्रवाल यांच्यावरही गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली होती आणि तेव्हापासून ते येरवडा कारागृहात होते. या काळात अग्रवाल यांनी जामिनासाठी विविध न्यायालयात अर्ज दाखल केले होते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करत न्यायालयाने अखेर त्यांना जामीन मंजूर केला. या निर्णयामुळे पोर्शे अपघात प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपीविरोधात तसेच इतर संबंधितांवरही कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# एलपीजी तुटवड्यामुळे स्मशानभूमींमध्ये विद्युत दाहिन्यांचा वापर

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या निर्देशानुसार देशभरात प्रोपेन आणि ब्यूटेन या घटकांचा प्राधान्याने घरगुती एलपीजी पुरवठ्यासाठी वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर गॅस उपलब्धतेत तात्पुरती अडचण निर्माण झाल्याने पुणे महापालिका हद्दीतील गॅसवर चालणाऱ्या दाहिन्या पुढील आदेश येईपर्यंत तात्पुरत्या बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाकडून देण्यात आली.



गॅसटंचाईमुळे अंत्यसंस्कार प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी महापालिकेने पर्यायी व्यवस्था म्हणून शहरातील विविध स्मशानभूमींमध्ये विद्युत दाहिन्या आणि एपीसी (एअर पोल्यूशन कंट्रोल) प्रणालीवर आधारित यंत्रणा कार्यरत ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांनी अंत्यसंस्कारासाठी शक्यतो विद्युत दाहिन्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

बिबवेवाडीतील वैकुंठ स्मशानभूमीत महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडमार्फत गॅसपुरवठा होणाऱ्या दोन गॅसदाहिन्या सध्या सुरू राहणार आहेत. मात्र, धनकवडी आणि कात्रज परिसरातील नागरिकांनी या दाहिन्यांवर अतिरिक्त ताण येऊ नये, म्हणून शक्यतो पर्याय म्हणून विद्युत दाहिन्यांचा वापर करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

वैकुंठ स्मशानभूमीत सध्या कार्यरत असलेल्या तीन गॅस दाहिन्या गॅसटंचाईमुळे बंद राहणार असून, नागरिकांच्या सोयीसाठी तेथील पाच विद्युत दाहिन्या सुरू ठेवण्यात येणार आहेत. त्यामुळे अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरळीत सुरू राहील, असा विश्वास महापालिकेने व्यक्त केला आहे. दरम्यान, महापालिकेकडून नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, म्हणून शहरातील विविध भागांतील विद्युत दाहिन्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दोन लाखांची लाच मागितल्याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षकाविरुद्ध गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

तक्रारदाराविरुद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून बंडगार्डन पोलिस ठाण्यात कार्यरत एका उपनिरीक्षकाविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक (एसीबी) विभागाने गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे शहर पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात ४० वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. 'एसीबी'ने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यक्तीच्या विरोधात एका व्यक्तीने बंडगार्डन पोलिस ठाण्यात फसवणुकीसंदर्भात अर्ज केला होता. या अर्जाची चौकशी पोलिस उपनिरीक्षक संदीप खेडकर (रा. वानवडी) करत होते.

या प्रकरणात तक्रारदाराविरुद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी खेडकर यांनी दोन लाख रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदाराने तीन फेब्रुवारी रोजी 'एसीबी'कडे तक्रार केली. पडताळणीदरम्यान खेडकर यांनी स्वतःसाठी आणि वरिष्ठांसाठी मिळून तडजोडीअंती एक लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार उपनिरीक्षकाविरुद्ध बंडगार्डन पोलिस ठाण्यात ९ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'एसीबी' पुणे विभागाचे पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस आयुक्त नीता मिसाळ यांच्या पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रवीण निंबाळकर करत आहेत. दरम्यान, कोणताही शासकीय अधिकारी, कर्मचारी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाच मागत असल्यास नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सुसंगत फौंडेशनतर्फे महिला दिनानिमित्त २० कर्तबगार महिलांचा सन्मान

**पुणे । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सुसंगत फौंडेशन, पुणे यांच्या वतीने महिलांचा सन्मान आणि गरजू महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सदाशिव पेठ येथील वेदशास्त्रोतेजक सभागृह, सणस ग्राऊंडजवळ आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. उज्ज्वला दीक्षित उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पल्लवी प्रसाद होत्या. अध्यक्षांच्या हस्ते डॉ. सुवर्णा कराड (प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण २० कर्तबगार महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुण्या डॉ. उज्ज्वला दीक्षित यांनी महिलांना प्रेरणादायी संदेश देताना स्वतः तरा आणि इतरांनाही तारून न्या असे आवाहन केले. महिलांनी स्वतःच्या प्रगतीसोबत समाजातील इतर महिलांनाही सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत कुटुंबांनी आग्रही राहण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमात महिलांच्या आरोग्याबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली. अनेक महिला मला काही होत नाही, मग तपासणी कशासाठी? या मानसिकतेमुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, ही प्रवृत्ती बदलण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

या कार्यक्रमात दहा गरजू महिलांना साडी वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सुधाकर न्हाळदे, श्री. धोंडीराम गडदे, डॉ. संयोगिता नाईक, ॲड. वैशाली करे, श्री. जयंत जोगळेकर व सौ. संगीता न्हाळदे यांनी केले. कार्यक्रमाला महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.